# अथातो धर्मजिज्ञासा

हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म




कुमारी शक्तिलीला ( निकिता राजेश पाटील)

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अथातो धर्म- जिज्ञासा

(हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)

निकिता राजेश पाटील

**एका विद्यार्थिनीने** लिहीलेलं हे पुस्तक.

तुम्हाला विनामूल्य वाचायला देण्याचा एकच हेतू आहे, तो म्हणजे तुमचा अभिप्राय जाणून घेणं. या विचारांच्या जडणघडणीत सुजाण वाचकांच्या सूचनांचा आभारपुर्वक समावेश करणं.

वाट पहातो आहोत. फ़ोन, whatsapp, email साधे पत्र कोणत्याही पद्धतीने आपला अभिप्राय नक्की पोहोचवा.


निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ,
वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

# अथातो धर्म- जिज्ञासा

## (हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)

निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www. esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
eternity,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : दोन एप्रिल २०२२ (गुढीपाडवा शके १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

***अथातो धर्म- जिज्ञासा***

***(हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म)***

-निकिता राजेश पाटील

**परिचय :** नाव:-निकिता राजेश पाटील.

वांगणीत वास्तव्य.

"कुमारी शक्तिलीला" या नावाने कविता लेख कथांचे लेखन.

वाङ्मयीन परिचय-

१. चंद्रिका अशा मासिकात श्लोक लेखन.

२. टिळक नगर सांस्कृतिक महोत्सवात 'द्रौपदीचे स्वगत' या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण.(वेशभूषा, प्रयोग लेखन, फार्सलेखन यांचा मेळ)

३. विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात (सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त 'द्रौपदीचे आत्मकथन' हा ललित लेख, 'मनाचे प्रदुषण' ही कविता व 'बायको नावाचं अजीब रसायन' ही विनोदी कथा प्रकाशित.

४. डोंबिवलीतील आणि बदलापुरात काव्य संमेलनात सक्रिय सहभाग.

५. अनेक निबंध, वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक.

६. संस्कृत भाषेतील 'अमृत गौरव' पुरस्कार.

७. अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात 'नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर' या लेखाचे लेखन.

८. मानव विद्या विभागात ‘वाचन संस्कृती'- डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व’ या विषयांवर संशोधन.

९. ‘फार फार वर्षांपूर्वी' व ‘संघर्ष’ , ' सीमान्त' या तीन पुस्तकांवर केलीली समीक्षा.

त्यातील ‘संघर्ष' या समीक्षाला पुरस्कार प्राप्त.

१० ‘मनोजन' या मासिकात ‘मानसिक आरोग्याचा मूलमंत्र' या विषयावर लेख.

११. चित्रकलेत गोल्ड मेडल.

१२. इ साहित्यावर एक रहस्य कथासंग्रह, दोन कादंबऱ्या (द्रौपदी वर आधारित), अद्भुत कथासंग्रह, विडींबन काव्य संग्रह, चार आध्यात्मिक ग्रंथ, एक विज्ञान लेखमाला, अशी एकूण दहा पुस्तके प्रकाशित झाली.

१२. ‘अथातो धर्म जिज्ञासा' या हिंदू तत्त्वज्ञान आणि अध्यात्म या विषयावर प्रबंध.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत. त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

शिक्षण:- एसवाय बीए.

फोन नंबर:- ८६८९९५४८०६ 👸 👰 👸

# अर्पणपत्रिका

*माझ्या प्रेमळ, स्नेहलता, मनस्विनी, मेधावी, महाभारतील सारमौक्तिकांचे ज्ञान प्रदान करणाऱ्या, अध्यात्म आणि गृहस्थाश्रम यांना एकाच गाडीची चक्रे बनविणाऱ्या, विश्वातील रहस्ये उलगडून देणाऱ्या, माझ्या मातेला व गुरुला हा संशोधन प्रबंध समर्पित.*

*तुझी पुत्री आणि शिष्या, कुमारी शक्तिलीला*

# उपोद्घात



भारतीय हिंदू तत्वज्ञान फक्त आध्यात्मिक दृष्ट्या नव्हे, तर वैज्ञानिक दृष्ट्या, भौगोलिक दृष्ट्या, सांस्कृतिकदृष्ट्या सामाजिक दृष्ट्या, मानसिक दृष्ट्या आणि वैश्विक दृष्ट्याही महान, सर्वश्रेष्ठ आणि सखोल आहे.

महर्षी भारद्वाज आणि त्यांची कन्या:- रात्री ने आपल्या एका सूक्तातून ग्रहणाविषयी सांगितले , याशिवाय वायूयानाचेही निर्माण केले होते, तर महर्षी कणाद यांनी अणु व गतीचे नियम प्रतिपादिले होते.

नाट्य व संवाद संरचनेचे मूळही सरमा पणी सूक्त, अगस्तपत्नी लोपामुद्रेचे सूक्त व पुरुरवा- उर्वशी सूक्त अशा सूक्तांत आढळते.

जैन धर्माच्या स्यादवादाचेही मूळ नासदीय सूक्तात आढळते, तर सामाजिक संस्थेचा उगम पुरूष सूक्तात आढळते.

तत्वज्ञानात महत्त्वपूर्ण मानला जाणारा कर्मसिध्दांत विश्ववरा ह्या आत्रेयी ऋषिकेने मांडला, तर सार्पराज्ञी ऋषिकेने सुर्यमंडळाविषयी प्रतिपादन केले आहे की सूर्याभोवती विभिन्न प्रकारचे ग्रह परिक्रमा करतात, पृथ्वीलोकसुद्धा. शिवाय सूर्य हा अंतरिक्षाचा केंद्रबिंदू आहे.

याशिवाय ऋग्वेदापासून आयुर्वेद निर्माण करणारे आचार्य सुश्रुत यांनी त्या काळी ३०० प्रकारच्या शल्यक्रिया, त्यांची विभिन्न प्रकारची १२५ हून अधिक यंत्रे शोधली होती. त्यांनाच कृत्रिम अवयवांचा जनक मानले जाते.

*मी ज्यावेळी वेद- उपवेद हाताळले, उपनिषदांचा अभ्यास केला, भगवद्गीतेचा पठण केले आणि पुराणे वाचली, त्यावेळी ही महान रत्ने माझ्या हाती गवसली.*

*त्याचवेळी माझ्या लक्षात आले, हे तत्वज्ञान जगासमोर आले पाहिजे, कारण कित्येक लोक या ज्ञानापासून वंचित आहेत.*

*मला सर्वप्रथम हे तत्त्वज्ञान मांडण्याची संधी मिळाली ती संशोधनामार्फत, पण ती कार्यशाळा रद्द झाली, मात्र माझे संशोधन नाही.*

*हिंदू तत्वज्ञान हे खरोखरच महान आहे आणि हे विविध विश्वविद्यालयांत शिकवलं जातं, मात्र हे घराघरांतही शिकवले गेले पाहिजे.*

*ऋग्वेदचा एक भाग पूर्ण झाला आहे, आता यजुर्वेदासाठी लिहिण्याचा मानस आहे..*

# अथातो धर्म- जिज्ञासा

## हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म

*(संशोधनपर प्रबंध)*

मी शीर्षकात वेदांतील आद्यवचन- प्रथमवचन:- ‘अथातो धर्मजिज्ञासा' या वेदवचनाचा प्रयोग केला आहे. कारण धर्माचे व अध्यात्माचे मूलक ‘जिज्ञासा’ हेच आहे. इतकेच नव्हे तर, ज्ञानदेखील जिज्ञासेद्वारेच प्राप्त होते. मनुष्याने जिज्ञासेकारणेच ज्ञानाच्या विभिन्न स्त्रोतांचे प्रशोधन केले आहे, पुराश्मयुगापासून ते आतापर्यंत मनुष्याने विभिन्न जीवनोपयोगी वस्तूंचा शोधही त्याच जिज्ञासेपोटी लावला आहे.

म्हणून धर्माचा उदयही जिज्ञासेतूनच झाला, याशिवाय तत्त्वज्ञानाचा जन्मही जिज्ञासेतूनच झाला होता.

या कारणांमुळेच मी माझ्या प्रबंधाला ‘अथातो धर्मजिज्ञासा’ हे शीर्षक दिले आहे.

माझ्या प्रबंधाच्या विषयाबद्दल सांगायचे झाले तर, माझ्या संशोधन-प्रबंधाचा विषय ‘हिंदू तत्त्वज्ञान आणि

अध्यात्म' हा आहे. हा विषय निवडण्याचे कारण की हिंदू तत्त्वज्ञान साक्षात अध्यात्ममयी आहे. हिंदू तत्त्वज्ञानातील ईश्वर, ब्रम्ह, मोक्ष,परमात्मा, आत्मा इत्यादी आध्यात्मिक ज्ञानाचे मूलक असणाऱ्या विभिन्न संकल्पना मनुष्याला धर्मपालनाकरिता प्रवृत्त करत असतात.

याखेरीज हिंदू धर्माचा मूळ पायाच हा मोक्ष आहे. आणि मोक्ष ही संकल्पना-पुरुषार्थ अध्यात्मातूनच जन्मली आहे.

म्हणून मी हा विषय प्रबंध-संशोधनाकरिता निवडला आहे.

## • संशोधनाची गरज

खरं पाहता, अध्यात्म हा संशोधनाचा विषय नव्हे, तर अनुभवाचा विषय आहे. मात्र या तंत्रज्ञानाच्या युगात अध्यात्माकरिता संशोधनाचे स्थान प्राप्त होणे हीच फार मोठी बाब आहे.

तसे म्हणजे अध्यात्मावर संशोधन होणे गरजेचेच आहे आणि हिंदू तत्वज्ञानावरही. कारण आजकाल सुशिक्षित लोकही या महान तत्वज्ञानाकडे दुर्लक्ष करत आहेत, या महान तत्त्वज्ञानाची उपेक्षा करत आहेत, विज्ञानाची कास धरत असताना हे विसरत आहेत की तत्त्वज्ञान व विज्ञान एकमेकांच्या हातात हात घेऊन चालणारे दोन मानवजातीचे आधारस्तंभ आहेत आणि धर्म हा त्या उभयंताचे मूलतत्व-उगमतत्त्व आहे.

याखेरीज हिंदू मुला-मुलींना आपल्या धर्माच्या तत्त्वज्ञानात रुची वाढविण्याकरिता आणि हिंदू तत्त्वज्ञानाचा अभ्यास- चिंतन वाढवण्याकरिता हे संशोधन आवश्यक आहे.

स्व-धर्मजागृती, सनातन धर्म- संस्कृती आणि परंपराच्या उन्नती व जागृतीकरिता अशी संशोधने,चिंतने आणि प्रशोधने होणे आवश्यक आहे.

## ● *प्रस्तृत संशोधनाचे महत्त्व*

या संशोधनाचे महत्त्व जितके वर्णन करावे, तितके थोडे आहे. तरीही संशोधनानुरूप महत्व सांगणे आवश्यकय ठरतेच.

१) मला-स्वत:ला हिंदू तत्त्वज्ञानातील विविध महत्त्वपूर्ण संकल्पनाचे पूर्णतः ज्ञान प्राप्त होईल, ते या संशोधनाद्धारेच.

२) अध्यामातील विविध संकल्पना, कारके आणि अनुभूतींचे संज्ञान प्राप्त होईल.

३) हिंदू तत्त्वज्ञानातील यथार्थ सर्वांना पटेल.

४) सुशिक्षित लोकांना या महान तत्त्वज्ञानाचे महत्त्व पटेल.

५) किशोरवयीन मुलांची- मुलींची रुची आपल्या धर्माच्या तत्त्वज्ञानात अधिक वाढेल.

६) स्वधर्म जागृतीचा मार्ग प्रशस्त होईल.

## • *प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे*

संशोधन हे विभिन्न विषयांवर केले जाते. प्रत्येक विषयानिगडित असणाऱ्या संशोधनामागे काही ना काही उद्दिष्टे असतातच. त्याच प्रमाणे माझ्याही संशोधनामागे काही उद्दिष्टे आहेत.

ती उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:-

१) हिंदू तत्त्वज्ञानातील विविध प्रमुख संकल्पनाचे ज्ञान प्राप्त करणे.

२) अध्यात्मसंबंधित संकल्पना, कारके, अनुभूती आणि संज्ञानाचा अभ्यास करणे.

३) सनातन धर्माचे- त्याच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व जाणणे.

४) हिंदू तत्त्वज्ञानातील ज्ञान प्रसृत करणे.

५) स्व-धर्मजागृतीचा प्रयास करणे.

## • संशोधनाची गृहितके

संशोधन कार्य सुरू करण्यापूर्वी संशोधनासंबंधकाही तर्क-वितर्क, विधाने, बाब गृहीत धरून संशोधने केली जातात. त्यालाच संशोधनाची गृहीतके म्हणतात. संशोधकाने ही गृहीतके त्याच्या पूर्वज्ञानानुरूप अथवा विश्लेषण, वाचन, पूर्वश्रवण, स्मरण, मानसिक आकृतिबंधानुसार गृहित धरलेली विधाने अथवा तर्क असतात. गृहीतके ही संशोधनाची मुळे असून त्यांच्यामुळे संशोधनाला नवा आधार व विचार प्राप्त होतो. गृहितकांमुळे संशोधनाभोवती एक उत्तम सांदर्भिक आकृतीबंध प्राप्त होतो.

## • प्रस्तृत संशोधनाचे सिध्दांत

हिंदू तत्त्वज्ञानात आणि अध्यात्मात गृहितके नसतात, सिद्धांत व संकल्पना असतात.

त्याकारणे माझ्या पूर्वभ्यासानुसार असलेल्या संकल्पना:-

१) हिंदू तत्त्वज्ञानात मोक्ष या पुरुषार्थाला सर्वोपरी महत्त्व आहे.

२) अध्यात्मातही मोक्ष-मुक्ती हेच जीवितध्येय मानले आहे.

३) हिंदू तत्त्वज्ञानात उपनिषदामध्ये 'अहं ब्रह्मसि' 'त्वम् ब्रह्मासि', 'सर्वम् खल्विदं ब्रह्मासि' ही ब्रह्मसूत्रे आहेत, जे मनुष्याच्या आणि आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान देतात.

४) हिंदू तत्त्वज्ञानात प्रस्थानत्रयी म्हणजे ज्ञानाकडे घेऊन जाणारे तीन मार्ग- वेद, उपनिषदे आणि भगवद्गीता हे होय.

५) अध्यात्मात ईश्वर, गुरु, सद्गुरु यांना मूर्धन्य स्थान असते.

६) आणि याशिवाय अध्यात्मात- हिंदू तत्त्वज्ञानात 'एक सत्' लाच परम- उत्पत्ती बिंदू मानले गेले आहे.

## ● परिचय हिंदू तत्त्वज्ञानाचा: संक्षिप्तात

सर्वप्रथम आपण ‘हिन्दु’या शब्दाची व्युत्पत्ती पाहूया. ‘हिन्दु’ हा शब्द सिकंदर अथवा यवन लोकांच्या शब्दांद्वारे अथवा त्यांच्या ग्रंथातील ‘हृदुश’ व ‘हिदुश’ या उपशब्दांकारणे निर्माण झालेला नाही तर ‘हिन्दु’ या शब्दाची उत्पत्ती ‘इन्दु’ अथवा ‘सिन्धु’ या शब्दापासून झाली आहे.

‘इन्दु’ या शब्दाचा अर्थ चंद्र, सोम, अमृत ,अथवा कर्पूर असा होतो. याचाच अर्थ ‘हिन्दु’ म्हणजे चंद्रवंशी, ईश्वर भक्त आर्य असा अर्थ घेण्यास काहीच हरकत नाही.

आणि अमृताचा यथार्थही जोडल्यास ‘हिन्दु’ या शब्दाचा अर्थ चंद्रासारखे प्रकाशित आणि अमृताप्रमाणे अजरामर कीर्ती पसरविणारे, असाही होऊ शकतो.

याखेरीज ‘सिन्धु’ या शब्दाचा अर्थ सर्वविदित आहेच:- समुद्र, सागर. म्हणजेच ‘हिंदु’ या शब्दाचा अर्थ ‘विशालहद्यी असाही होतो.

ऋग्वेदातील बृहस्पती आगमातील भेदिनी कोशामध्येही तसाच उल्लेख आढळतो.

***ॐ कार मूलमंत्राढ्य: पुनर्जन्म दृढ़ाशय:***

***गोभक्तो भारतगुरु: हिन्दुर्हिंसनदूषक:।***

***हिंसया दूषयते चित्तं तेन हिन्दुरितीरित:।***

***हिन्दूहिन्दूश्च:*** ||

अर्थ :- ओंकार हा ज्याचा मूलमंत्र आहे, पुनर्जन्मावर ज्याची दृढ श्रद्धा आहे, जो गोभक्त असून भारतामध्ये ज्याचा जन्म झाला आहे, जो हिंसेला दुषणे देत असून धर्माचे निर्वहन करतो तो हिंदूच असतो.”

याशिवाय हिंदुस्थान शब्दाचा उल्लेख ऋग्वेदाच्या बृहस्पत्यागमात आढळतो.

“ ***हिमालयं समारभ्य यावद् इन्दुसरोवरं ।***

***तं देवनिर्मितं देशं हिन्दुस्थानं प्रचक्षते ।।***

अर्थात हिमालयापासून इन्दु सरोवरापर्यंत देवांनी स्थापन केलेला देश म्हणजे हिन्दुस्थान होय. तसेच मेरूतन्त्रातही (शैवग्रन्थ) म्हटले आहे की ***हिनं च दूष्यत्येव हिन्दुरित्युच्यते प्रिये ।***

अर्थात ज्याने अज्ञानतारूपी हिनतेचा त्याग केला आहे, तो हिंदू होय. याचबरोबर शब्दकल्पद्रुमातही असेच म्हटले आहे . ***हीनं दूषयति इति हिन्दुः ।***

पारिजात हरणामध्येही हिन्दु ची परिभाषा अशीच सांगितली आहे.....

*“ हिनस्ति तपसा पापां दैहिकां दुष्टं |*

*हेतिभि: शत्रुवर्गं स हिन्दुर्भिधियते ||*

अर्थात जो आपल्या तपाने शत्रुंचा, दुष्टांचा आणि पापांचा नाश करतो, तोच हिन्दू आहे.

आता आपण हिंदू तत्त्वज्ञानातीलच ‘तत्त्वज्ञान’ या शब्दाची व्युपत्ती पाहूया.

वेदांमध्ये तत्त्वज्ञानाला दर्शन, परा विद्या, आन्वीक्षीकी अशा संज्ञा वापरलेल्या आहेत. आन्वीक्षीकी अथवा दर्शन म्हणजे विश्वाकडे अतींद्रिय सत्तेकडे पाहण्याचा दृष्टिकोन. याशिवाय ज्ञान अपरिवर्तनशील असते, नष्ट होणारे नसते, अशा अक्षय व अनंत ज्ञानाला वेदांनी ‘पराविद्या’ असे संबोधले आहे.

याखेरीज तत्वज्ञान म्हणजे तत् + ज्ञान:- त्या पदार्थाच्या साराचे ज्ञान ही व्युपत्तीही आढळते.

हिन्दु तत्त्वज्ञानाविषयी सांगायचे झाले तर, हिंदू तत्त्वज्ञानात भगवद् गीता, चार वेद व उपवेद, एकशेतेराहून अधिक उपनिषदे, अठरा पुराणे, षड्दर्शने, शक्तीसूत्रे,ब्रह्मसूत्रे, ब्राह्मण्ये,आरण्यके इत्यादी अनेक अनंत मार्गदर्शक महाग्रंथ आहेत. जे साक्षात तत्त्वज्ञान, अध्यात्म, विज्ञान, अर्थकारण व समाजकारणाकरिता ज्ञान भांडार आहेत.

हे सर्व महाग्रंथ मनुष्याच्या जीवनाचा उद्गम असणाऱ्या धर्माचे- ईश्वराचे- आत्म्याचे परम ज्ञानस्त्रोत आहेत आणि हेच महाग्रंथ हिन्दु तत्वज्ञानाचे मूलकही आहेत.

## ● *अध्यात्माचा परिचय (संक्षिप्तात)*

अध्यात्म कुठल्याही प्रकारचे शास्त्र नाही. अध्यात्म हा कोणत्याही प्रकारचा विषय नाही, कारण अध्यात्म हे सर्व शास्त्रांपलीकडचे आहे. अध्यात्मामध्ये कुठल्याही प्रकारचा विषय- विकार नव्हेत.

तरीही हिंदू तत्त्वज्ञानात अर्थातच वेदांमध्ये सत्ताशास्त्र अथवा सद्वस्तूमीमांसा नामे जे विश्वोत्पत्तीचे रहस्य सांगितले आहे, तेच अध्यात्मशास्त्राशीच निगडित आहे.

याशिवाय तत्वज्ञानाच्या शाखांपैकी एक शाखा सत्ताशास्त्र अथवा सद्वस्तूमीमांसा हीदेखील मानली जाते. या शास्त्राचा संबंधही अध्यात्माशी निकटतेने आहे.

अध्यात्म म्हणजे अधि+आत्म- आत्म्याचे -अतीन्द्रिय सृष्टीचे ज्ञान म्हणजे आत्मस्वरूपाचे ज्ञान, आपल्या मूळ स्वरूपाचे ज्ञान होय.

भगवद्गीतेत असे म्हटले आहे, ‘स्वभावो अध्यात्म उच्यते'. या श्लोकाचा अर्थ असा आहे की मनुष्याच्या स्वत्वाचा भाव जाणून घेणे म्हणजेच अध्यात्म होय.

हाच अर्थ कृष्णालाही अभिप्रेत असावा.

याशिवाय असेही म्हटले जाते की अध्यात्म कुठलेही पारलौकिक तत्वज्ञान नव्हे, तर स्व-स्वरूपाचे/ स्वतःच्या मूळ स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करण्याचा मार्ग आहे.

# *हिंदू तत्त्वज्ञानाचे मूलक- वेदांतील तत्त्वज्ञानातील अध्यात्म*

हिंदू तत्त्वज्ञानाचे मूलक आहेत ते-अपौरुषेय वेद- वेदांना अपौरुषेय म्हटले जाते, कारण ईश्वरी सत्तेने हे चारी वेद ऋषींकडे सोपावले. याशिवाय असेही मानले जाते की ध्यानामध्ये ऋषींना वेद स्फुरले होते.

खरं पाहता, वेद हा शब्द विद् (जाणणे, ज्ञान प्राप्त करणे) या उभयनेपदी धातूपासून निर्माण झाला आहे.

वेदांमध्ये अनेक ऋषिका व ऋषींचे विचार सामावलेले आहेत. वेद एकूण चार आहेत-ऋग्वेद,यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद. तसेच या वेदांपासून चार उपवेद निर्माण झाले- ते म्हणजे ऋग्वेदापासून आचार्य सुश्रुतनिर्मित आयुर्वेद, यजुर्वेदापासून धनुर्वेद, सामवेदापासून गंधर्व वेद, अथर्वेदापासून शिल्पवेद अथवा यातुविद्या कोश.

प्रत्येक वेदाचे चार भाग मानले जातात, ते खालीलप्रमाणे:-

१) संहिता:- इंद्र, उषा,अग्नि, स्वाहा, रश्मी अशा निसर्ग देवतांची स्तने.

२) ब्राम्हणे:- यज्ञविधीचे हेतू, फल, इष्टता यांचे ज्ञान, इत्यादि.

३) आरण्यके:- यज्ञाचे प्रयोजन, मानसिक स्तरावर- आत्मिक स्तरावर यज्ञ कसा करावा, याचा विधी.

४) उपनिषदे:- वेदांचा अंतिम भाग, वेदान्त.

हे झाले वेदनांचे संज्ञान- आता आपण वेदांतील अध्यात्म- ज्ञानाच्या मार्गाकडे वळूया.

# ऋग्वेद

- ऋग्वेद हे हिंदू धर्माचे, संस्कृत- देववाणीचे, देवतांचे, मानवांचे आणि सृष्टीचे आद्य वाङ्मय आहे. हे विश्वाचे प्राचीनतम वाङ्मय आहे. ऋग्वेद ही वैदिक वाङ्मयाची आद्य रचना मानली जाते. ऋग्वेदात १०,०२८ सूक्ते असून १० मंडले आणि १०,६०० हून मंत्र आहेत. ऋग्वेदाच्या रचयिता असलेल्या ऋषिकांपैकी आदिती, वागाम्भृणी, शची, सरमा, श्रध्दा कामायनी आणि विश्ववरा इत्यादी प्रमुख ऋषिका आहेत आणि ऋषिंपैकी भारद्वाज, विश्वामित्र,अत्रि, प्रजापती, वामदेव, त्रित इत्यादी प्रमुख ऋषि आहेत.

ऋग्वेदाच्या मंत्र-श्लोकाला ऋचा म्हटले जाते. 'ऋचा' हा शब्द 'ऋक्' ह्या धातूपासून निर्माण झाला आहे. 'ऋक्' चा असा अर्थ आहे की

***ऋच्यन्ते स्तूयन्ते देवा अनया इति ऋक्***:- ज्या श्लोक मंत्राकारणे देवतांची स्तुती होते, असे त्रिकालाबाधित सत्य मंत्र म्हणजे ऋक् होय. ऋग्वेदातील 'ऋचेला' 'ऋक्' ला ब्राम्हण्ये ग्रंथामध्ये ब्रम्ह, वाक् अमृत अथवा प्राण असेही म्हटले आहे.

ऋग्वेदाच्या २१ शाखा आहेत. त्यातील सहा शाखा मुख्यतम आहेत.

शाकल, वाष्कल, आश्वलायनी, शांखायनी,

माण्डूकायनी व मैत्रायनी.

ऋग्वेदातील आपण काही सूक्तांचे विवेचन पाहू, जे अध्यात्माशी सखोल रितीने निगडित आहेत.

## • *नासदीय सूक्त*

सर्वप्रथम विश्वोत्पत्तीचे रहस्य- नासदीय सूक्त जाणून घेऊया. हे सूक्त ऋग्वेदातील सर्वात लहान सूक्त आहे, जे फक्त सात ऋचांचे आहे. मात्र वेदांचे वैशिष्ट्य असे आहे की एका ऋचेतच अनंत आशय सामावलेला आहे.

असे म्हटले जाते की, हे सूक्त प्रजापतीने स्वयं रचले आहे. या सूक्तात सृष्टीची पूर्वास्थिती निर्मिती, सृष्टीचे आधारतत्त्व व स्वरुप याविषयी चर्चा केली आहे. हे सूक्त मी येथे लिहीत आहे:-

***नासदासीन्नो सदासीत्तदानीं नासीद्रजो नो व्योमा परो यत्|***

***किमावरीव: कुह कस्य शर्मनम्भ: किमासीद्गहनम् गम्भीरम्||***

न मृत्युरासीदमृतम् न तर्हिं न रात्र्या अहन आसीत्प्रकेत्|

आनीदवातम् स्वधया तदेकम् तस्माध्दान्यन्न पर: किञ्चनास||

तम आसीत्तमसा गृहळमग्रे प्रकेतम् सलिलम् सर्वाइदम्|

तुच्छयेनाभ्वपिहित

यदासीत्तपसस्तन्महिनाजायतैकम्||

कामस्तदग्रे समवर्तताधि मनसो रेत: प्रथमम् यदासीत्|

सतो बन्धुमस्ति निरविन्दन्हवि प्रतीष्या कवयो मनीषा||

तिरश्चीनो विततो रश्मिरेषामधः स्विदासीदुपरि स्विदासीत्।
रेतोधा आसन्महिमान आसन्त्सस्वधा अवस्तात्प्रयति परस्तात्॥

को अध्दा वेद क इह प्र वोचत्कुत आजाता कुत इयं विसृष्टि।
अवाग्देंवा अस्य विसर्जनेनाथा को वेद यत् आबभूव॥

इयं विसृष्टियत आबभूव यदि वा दधे यदि वा न।
यो अस्याध्यक्षः परमे व्योमन्त्सो अङ्ग वेद यदि वा न वेद॥

हे सूक्त ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १२९ वे सूक्त आहे. ह्या सूक्ताचा असा अर्थ आहे की या विश्वाची उत्पत्ती होण्यापूर्वी कोणाचेही अस्तित्व अथवा अनस्तित्त्व होते, याचाच अर्थ या जगताचा आरंभ शून्यापासून झाला आहे. त्याकाळी वायू, आकाश, आदि महातत्वे नव्हती, त्यापलीकडे काहीच नव्हते. चारी दिशांना व्यापणारा फक्त गंभीर-गहन अंधकाराचा समुद्र होता. त्याक्षणी अमरत्व-मृत्यु, रात्र-दिवस असे भेद द्वंद्वेही नव्हती. त्यावेळी फक्त एकच स्वधेचा श्वास होता, जो आवेगपूर्ण आणि वायूहिन होता. सर्वप्रथम अंधकार, नंतर तसेच कृष्णवर्णी चिन्हविहीन जल होते, जे शून्याने आच्छादित आणि ज्ञानाच्या शक्तीने व्याप्त होते. (जायत्) आरंभीस स्वधेची एक इच्छा पृथ्वीवर अवतरली,तेच आदिम बीज असून ‘सत्’ चे बन्धु आहे. ऋषिवरही हेच म्हणतात, ज्यांनी बुद्धीच्या साहाय्याने मनाचे प्रशोधन केले आहे- तो परमउत्पत्तिबिंदु आहे,

त्याच्याप्रमाणे अन्य कुठल्याही तत्त्वाचा उगम होऊ शकतच नाही. आणि त्याच ऋषींनी असे त्या किरणाला विस्तृतभूत केले आहे की त्या किरणाच्या विस्ताराला अशाप्रकारे जाणले आहे, वर काय आहे, खाली काय आहे! सर्वश्रेष्ठ शक्तीने स्वधेने नवजात शक्तींची निर्मिती केली. म्हणूनच खाली शक्ती, तिच्यावर आवेग आहे. परंतु तरीही कोण हे जाणत आहे आणि म्हणतो आहे की हे सर्व कुठून उत्पन्न झाले? सृष्टी कशी निर्माण झाली? देवता तर साक्षात सृष्टीच्या निर्मितीनंतर प्रकट झालेले आहेत, तर कोण हे जाणत असेल की वास्तवात कोण कसे उत्पन्न झाले? साऱ्या सृष्टीची उत्पत्ती कशापासून झाली? सृष्टिकर्ता ईश्वर, त्याने या सृष्टीला निर्माण केले असो वा नसो, सृष्टिकर्ता ईश्वर, जो उच्चतम स्वर्गातून सर्वांचे निरीक्षण-परीक्षण करत असतो, तो कदाचित जाणत असेल अथवा नसेलही.

यावरून हेच जाणवते, स्वधा,जल, तमस्, स्फुरण करणारे तत्त्व, तेजोशलाका यांना सृष्टिचे बीज मानले जाण्याच्या संकल्पना श्रुती व सूक्तांमध्ये आढळते.

मात्र नासदीय सूक्तामध्ये स्वधेची इच्छा यालाच सृष्टीचे आदिम बीज मानले गेले आहे. नासदीय सूक्तामध्ये सांगितल्याप्रमाणे, सृष्टीचे आधारतत्त्व शून्य हे असावे

नासदीय सूक्त हे वेदांच्या 'एकसत्' चा उत्पत्तिबिंदु आणि उपनिषदांतील ब्रम्हविद्येचा आधार आहे.

इंद्रियगोचर विश्वाच्या पलीकडे असे एकमेव अमृततत्त्व आहे, हे अमृततत्त्व जाणचेच वेद व वेदांतशास्त्राचे ध्येय आहे, असे मानले जाते.

## • *वागाम्भृणी सूक्त*

अजून एका सूक्तात विश्वोत्पत्तीचे रहस्य सांगितले आहे, ते म्हणजे वागाम्भृणीय सूक्त.

हे सूक्त नासदीय सूक्ताइतकेच महत्त्वाचे सूक्त आहे. हे सूक्त ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १२५ वे सूक्त आहे. या सूक्ताचा छंद त्रिष्टुप असून देवता आत्मा अथवा परमात्मा आहे. अम्भृण ऋषींची कन्या व वाणीची देवता वाक् (वाणी) ही या सूक्ताची ऋषिका आहे. ब्रम्हसाक्षात्काराने वाक् ही देवता (ऋषिका) स्वतःच रचलेल्या सूक्ताद्वारे स्वतःच स्वतःची विश्वात्मक अनुभूती अभिव्यक्त करते आहे. ती स्वतःच कशी या विश्वाला व्यापून राहिली आहे, हेही स्पष्ट करते आहे. या सूक्तामध्ये वाणी हीच सृष्टिनिर्मितीचे कारण असल्याचे सांगितले जाते.

ते सूक्त पुढीलप्रमाणे:-

**अहं रुद्रेभिवसुभिश्चराम्यहमादित्यैरूत विश्वदेवै:।**

**अहं मित्रावरुणोभा बिभर्म्यहमिन्द्राग्नि अहमश्विनोभा॥**

**अहं सोममाहनसं बिभर्म्यहम् त्वष्टारमृतम् पूषणम् भगाम्।**

**अहं दधामि द्रविणम् हविष्यते सुप्राव्ये यजमानाय सुन्वते॥**

**अहं राष्ट्री संगमनी वसूनाम् चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम्।**

**ताम् या देवा व्यदधु: पुरुत्रा भूरिस्थात्राम् भूर्यावेशयन्तीम्॥**

मया सो अन्नमत्ति यो विपश्यति यः प्राणिति य ईं शृणोत्युक्तम्|
अमन्तवो माम्‌ त उपक्षियन्ति श्रुधि श्रुत श्रध्दिवम् ते वदामि||

अहमेव स्वयमिदं वदामि जुष्टं देवेभिरूत मानुषेभिः|
यम् कामे तम् तमुग्रम् कृणोमि तम् ब्रम्हाणम् तमृषिम् तम् सुमेधाम्||

अहम रूद्राय धनुरा तनोमि ब्रम्हाद्विषे शरवे हन्तवा उ|
अहम् जनाय समदम् कृणोम्यहम् द्यावापृथिवी आविवेश||

**अहम् सुषे पितरमस्य मूर्धन्स मम् योनिरप्स्वन्त: समुद्रे|**

**ततो वितिष्ठे भुवनानु विश्वोतामूदयाम् वष्मणोपस्पृशामि||**

**अहमेव वात इव प्रवाम्यारभमाणा भुवनानि विश्वा|**

**परो दिवा परे ना पृथिव्यैतावती महिमा सम् बभूव||**

या सूक्ताचा अर्थ:- ब्रह्मस्वरूपा असलेली मीच रुद्र, वसु, आदित्य आणि विश्वेदेवांच्या रुपांमध्ये विचरण करते अर्थातच त्यांच्याच रुपाने भासमान होत राहते. मीच आपल्या ब्रह्मरूपानेच मित्र आणि वरुणाला धारण करते. मीच इंद्र व अग्नी चा आधार आहे. मीच उभय अश्विनी कुमारांचे पोषण करते. मीच शत्रूनाशक कामादि दोष निवारक व परमानंददायी यज्ञगत सोम, चंद्रमा, मन अथवा शिवाचे भरण-पोषण करते. मीच त्वष्टा, पूषा आणि भगाला

धारण करते. जो यजमान यज्ञामध्ये सोमाभिषणाद्वारे देवतांना तृप्त करण्यासाठी स्वहस्ते हविष्य धारण करून हवन करतो, त्याला लोक-परलोक सुखकारी फल देणारी मीच फलदायिनी आहे. मीच राष्ट्री म्हणजे संपूर्ण राष्ट्राची, जगाची ईश्वरी आहे. मीच साधकांना त्यांचे अभिष्ट वसुधन प्राप्त करून देणारी आहे. जिज्ञासूंना साक्षात कर्तव्य वाटणारे परब्रम्ह हे माझे आत्मन् आहे. जिच्याकरिता यज्ञ केले जातात, अशी सर्वश्रेष्ठ देवता मीच आहे. संपूर्ण विश्वाच्या रुपाने मी एकच असून अनेक रूपांनी विराजमान आहे. सर्व प्राण्यांच्या शरीरामधील जीवनतत्व/ चैतन्यतत्व मीच आहे. भिन्न भिन्न देश, काळ, वस्तू आणि व्यक्तींमध्ये जे जे घडते आहे ते सर्व काही माझ्याकारणे व माझ्याकरिताच घडते आहे. या संपूर्ण विश्वामध्ये जो कोणी जे-जे करत आहे, ते सर्व काही मीच आहे. जो कोणी विभिन्न भोगांचा उपभोग

घेत आहे, तो माझ्या-भोक्त्रीच्या शक्तिकारणेच उपभोग घेत आहे.

जो कोणी हे विश्व पाहत आहे, जो कोणी श्वासोच्छ्वास-रुपाने व्यापार करतो,जो कोणी स्वर ऐकतो, तो ते सर्व काही माझ्यामुळेच करु शकतो. जो या प्रकारे त्यांच्या अंतरंगात वसलेल्या माझ्या स्वरूपाला जाणत नाही, तो अज्ञानी हीन-दीन, क्षीण होतो. हे बहुश्रुत विद्वाना, मी तुझ्यासाठीच ह्या ब्रम्हात्मक सद्वस्तूचा उपदेश करत आहे,जो केवळ श्रद्धेने प्राप्त होतो. मी स्वतःच अशा ब्रम्हात्मक सद्वस्तूचे ज्ञान देत आहे, जे ज्ञान देवतांनी व मनुष्यांनी ग्रहण केले आहे. मी स्वतः ब्रम्हा आहे. मी ज्याचे रक्षण करू इच्छिते, मी ज्याच्या इच्छा पूर्ण करू इच्छिते, मी त्याला स्वेच्छेने सृष्टिकर्ता ब्रह्माचे स्थान देईन अथवा बृहस्पतीप्रमाणे सर्वश्रेष्ठ ज्ञान आणि बुद्धी देईन. ब्रम्हज्ञानींच्या द्वेषी व हिंसारत असलेल्या अहंकारी त्रिपुरासुराचा वध करण्यासाठी मीच संहारक

रुद्राच्या धनुष्याला प्रत्यंचा चढविते. मीच स्वतः जिज्ञासी स्तुतिकारकांच्या शत्रुंसह युद्ध करून त्यांना परास्त करते. मीच द्युलोक आणि पृथ्वीमध्ये अंतयार्मी रुपाने समाहित आहे. या विश्वाच्या शिरोभागावर असलेल्या द्युलोकात विराजमान असलेल्या आदित्यरूप आदिपित्याचा प्रसव मीच करते. त्याकारणे तंतूंमध्ये तीव्र वेगाप्रमाणेच या सृष्टीत कार्य दिसत आहे. दिव्य कारणांच्या जलाने व्याप्त समुद्र, जो ब्रह्मचैतन्यरुप असून संपूर्ण प्राण्यांच्या- पदार्थांच्या उदय-निवास ज्याच्यामध्ये होत राहतो, तेच माझे निवासस्थान आहे. या कारणेच मी सर्व भूतमात्रांमध्ये सामावलेली असून हया भूतमात्रांचा अनुभव स्वतःच्या मायात्मक स्वशरीराने दृश्यकार्याला स्पर्श करून घेते. वायु ज्याप्रमाणे स्वयंप्रेरणेने प्रवाहित होतो, त्याप्रमाणे मी वागाम्भृणी (वाक् ऋषिका) दुसऱ्याकारणे प्रेरित वा अधिष्ठित नसून स्वतः कारण रूप असूनही सर्व कार्याचा आरंभ मी स्वयंच करते. मी पृथ्वी व

आकाशाच्याही पलीकडची आहे. मी सर्व विकारांच्या पलीकडची, असंग, अलिप्त असलेले ब्रह्मचैतन्य आहे. या विश्वात माझी महिमा सृष्टीच्या रूपाने बहरत आहे व बहरत राहिल.

खरं पाहता, हे प्रथमच असे सूक्त असावे की ज्याच्या मध्ये स्वयम् ऋषिका स्वतःच्या ब्रम्हात्मक स्वरूपाचे वर्णन करत आहे.

तरी ऋग्वेदातील स्त्री ऋषिकांद्वारे लिखित अन्य सूक्ते असली, तरी हे विशिष्ट व अद्वितीय सूक्त आहे. शिवाय स्वयं वाणी स्वतःची महती कथन करीत आहे, याहून विलक्षण आणि अद्भुत सूक्त अन्य कुठले असू शकेल.

याखेरीज हे सूक्त पारायण आणि पठणाकरिताही महत्त्वपूर्ण मानले जाते. हे सूक्त दुर्गा सप्तशती पाठ, देवी महात्म्य व देवी अथर्वशीर्षासह पठण केले जाते. मार्कंडेय

पुराणानुसार राजा सुरथ व वैश्य समाधीने हे सुक्त पठाण केल्यानंतर साक्षात दुर्गा देवीने त्यांना दर्शन दिले होते.

असेही म्हटले जाते, वागाम्भृणी अर्थातच वाक् देवतेने साक्षात ब्रम्हसूत्रे स्फुरित केली होती. वागाम्भृणी या वाक् देवतेसह गोधा,धरा, विश्ववरा, घोषा, इंद्राणी अशा स्त्री-ऋषिकाही सूक्तकर्त्या होत्या, ज्यांनी सर्वपठणोपयुक्त व अत्योष्कृष्ट सूक्ते रचली आहेत. उदा अगस्तपत्नी लोपामुद्रेचे सूक्त, सूर्या ऋषिकेचे सूक्त इत्यादी. आपण तीही सूक्ते पाहुया.

## • हिरण्यगर्भ सूक्त :- ऋषभ ऋचा

हे सूक्त ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १२१ वे सूक्त आहे. यातील ऋषभ ऋचेमध्ये असे म्हटले आहे की मूळ आधारततत्त्व् 'हिरण्यगर्भ' आहे, जे अनादि-अनंत आहे. या तत्त्वाला जाणून घेणे इतके सहज, सुकर नव्हे.

ऋषभ ऋचा ही हिरण्यगर्भ सूक्तामध्ये आढळते. हे सूक्त प्रजापतीसूक्त या नावानेही विख्यात आहे. ह्या सूक्ताचा ऋषी हिरण्यगर्भ प्राजपत्य हा असून त्रिष्टुभ छंद, दहा ऋचा आणि देवता हिरण्यगर्भ आहे. हिरण्यगर्भ म्हणजे सविता, स्वधा, प्रजापती अथवा ब्रम्हा.

याशिवाय हिरण्यगर्भ म्हणजे स्वर्णाचे बीज अथवा सुवर्ण, सूर्याप्रमाणे ज्ञानी, तेजस्वी तत्त्व असाही अर्थ विचारात घेतला जाऊ शकतो.

हिरण्यगर्भाचा उल्लेख असणारी ऋचा पुढीलप्रमाणे:

-

***हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत***|

***स दाधार पृथिवीम् द्यामुतेमाम् कस्मै देवाय हविषा विधेम***||

या ऋचेचा असा अर्थ आहे की स्वर्णाप्रमाणे तेजस्वी असलेली स्वधा अथवा परमात्मा सर्वप्रथम प्रकट झाली/ झाला. हा परमात्माच सर्व भूतमात्रांचा स्वामी झाला. त्या

स्वधेनेच पृथ्वी व आकाशाचे रुप धारण केले, तर आम्ही त्यालाच हवि दिला पाहिजे.

ही ऋचा व हिरण्यगर्भ सूक्तही ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलामध्येच आहे. हिरण्यगर्भ सूक्तातही विश्वोत्पत्तीविषयीच चर्चा केली गेली आहे.

त्या सूक्ताचा आशय -सारांश खालीलप्रमाणे:-

हिरण्यगर्भ हा ज्ञानमय असून सृष्टीचे मूलतत्व आहे. आकाश, पृथ्वी, जल व जीवसृष्टीला जन्म देणारी पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ देवता, अशीही त्याची ख्याती आहे. 'सविता' हे त्याचेच उपनाम आहे. सूर्यही त्याचाच कृपेने प्रकाशमान होतो. तो देवतांचा प्राण असून यज्ञदेवाचा जनक व सर्व देवतांचा वरिष्ठ आहे.

आता आपण आणखी सूक्ते पाहुया.

# आदिती सूक्त

ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील ७२ वे हे सूक्त आहे. या सूक्ताची ऋषिका आदिती- जी द्यौ आणि दक्षाची पुत्री आहे आणि या सूक्ताची देवता परावाक् म्हणजेच स्वयं आदितीच आहे.

याशिवाय या सूक्ताला 'बृहस्पती सूक्त' म्हणूनही ओळखले जाते. त्याकारणे या सूक्ताचे पठण विशेषतः बृहस्पतीवारी अर्थात गुरुवारी केले जाते. विवाहप्रसंगी, जातककर्मींही आणि वास्तूपूजनासमयीही या सूक्तातील ऋचांचे पठण केले जाते.

देवमाता आदिती देवीने या सूक्ताची अभिरचना बृहस्पती व अंगिरस ऋषिंसह केली आहे. आदिती देवी ऋषिकांमध्येही श्रेष्ठ गणली जाते.

ह्या सूक्तातही विश्वोत्पत्तीचे रहस्य सांगितले आहे. याखेरीज देवतांची उत्पत्ति, सृष्टीचा आरंभ आणि विकासाचे वर्णनही या सूक्तात आहे.

ह्या सूक्ताच्या ऋचा पुढीलप्रमाणे:-

**लोकनामन: पुत्रो बृहस्पतिरंगिरस एवं वा बृहस्पतिऋषी|**

**अथवा दक्षस्य दुहिता आदितीऋषि||**

**नामरुपविवर्णितत्वेनासत्समानादृढब्रम्हण: सकाशात्मन्नामरुप-विशिष्टम् देवादिकमजायत||**

**एनाम् मित्रीकर्तु संवादकुर्वन||**

या ऋचांचा अर्थ असा आहे की या सूक्ताची ऋषिका आदिती असून तिच्यासह या सूक्ताचे अन्य रचनाकर्ता बृहस्पति व अंगिरस ऋषी आहेत.

असत् म्हणजे नामरुप रहित उपादान कारण नाम-रुपादि विशिष्ट देवतांची उत्पत्ति झाली. अशाप्रकारे सत्य हे अप्रकट तत्त्वापासून प्रकट झाले.

**आदितिदयोरदितीरन्तरिक्षमदितिमाता सपिता सपुत्र:|**

**विश्वे देवा अदिति: पञ्चंजना आदितिजातमदितिजनित्वम्||**

या ऋचांचा अर्थ असा आहे की मित्र,वरुण, विश्वैदेव, रुद्र, इद्र, अर्यमान, सूर्य आणि अग्नि या सर्वांची माता-आदिती आहे. इंद्र आणि आदित्यांना तिच्यापासूनच शक्ती प्राप्त होते.

खरं पाहता,या सूक्तात आदितीदेवीला ब्रम्हशक्ति परावाक् तर दक्ष अर्थात सूर्याला ब्रम्ह मानले आहे. हीच ब्रम्हशक्ति सृष्टीचे कारण आहे.

या सूक्तात असे म्हटले आहे, दक्षाने स्वपुत्रीच्या-आदितीच्या गर्भात पुनः जन्म घेतला. ज्याचे नाम सूर्य-मार्तंड आहे. त्याकारणे सूर्याला, इंद्राला आणि अन्य देवगणांना, आदित्य म्हटले जाते.

याशिवाय या सूक्तात असेही कथन केले आहे की उत्तानपाद वृक्षापासून भूमी उत्पन्न झाली, भूमीतून दिशा उत्पन्न झाल्या. यापुढील मंत्रानुरुप आदितीने देवगणांना जन्म दिला. त्या देवतांपाठोपाठ अमृतबंधु म्हणजेच अमरदेव जन्मले. त्यानंतर आदितीने आपल्या पुत्रांना स्वर्ग प्रदान केला आणि मार्तंडाला नवा लोक प्रदान केला. याखेरीज या सूक्तात सप्तसिंधु, सप्तर्षि आणि दिव्य दिशांचे ही वर्णन आहे.

# पुरुष सूक्त

हे सूक्त जगप्रसिद्ध, जगतमान्य आहे. हे सूक्त यज्ञ, मंत्रपुष्पांजली, विवाहातील पाणिग्रहण, पूजन-पठणाकरिता उपयुक्त मानले जाते. हे सूक्त ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील ९० वे सूक्त आहे. या सूक्तात 'पुरुष' हा आलेला शब्द अन्य वेदांमध्ये (यजुर्वेद व अथर्ववेद) आला आहे. 'पुरुष' या शब्दाचा अर्थ परमात्मा, जीवात्मा, विराटपुरुष, यज्ञपुरुष असा अर्थाने आहे.

या सूक्ताचे ऋषी नारायण, तर देवता पुरुष आहे. या सूक्ताचा छंद षोडश त्रिष्टुप् असून हे सूक्त १८ ऋचांचे आहे. त्याकारणे मी ह्या सूक्ताच्या फक्त दोनच ऋचा लिहित आहे.

***सहस्त्रशीर्षा पुरुषः सहस्त्राक्षः सहस्त्रपात्|***

***स भूमिम् विश्वतोवृत्वात्यतिष्ठद्दशांगुलम्||***

***पुरुष एवेदम् सर्वत्र यद्भूतम् यच्च भव्यम्|***
***उतामृतत्वस्येशानो यद्हेननातिरोहति||***

या ऋचांचा अर्थ असा आहे की विराटपुरुषाचे अथवा यज्ञपुरुषाचे सहस्त्र नेत्र, सहस्त्र पाय आणि सहस्त्र मस्तके आहेत. हा समस्त भूमि, जगताला व्याप्त करुनही ब्रम्हाडांच्या दश अंगुले वर स्थित आहे. हे जगच विराटपुरुषाचे असून भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यही त्यात सामावलेले आहे. तो अमृतत्वाचा आणि अन्नाने जिवित राहणाऱ्या प्राण्यांचा शासक आहे.

याशिवाय यात असेही म्हटले आहे, कर्मावर असलेले चार्तुवर्ण्य विराटपुरुषातूनच उत्पन्न झाले. ब्राह्मण

विराटपुरुषाच्या मस्तकातून, क्षत्रिय त्याच्या बाहूतून, वैश्य त्याच्या मांडीतून व शूद्र त्याच्या चरणांतून उत्पन्न झाले.

चंद्र विराटपुरुषाच्या मनातून, सूर्य त्याच्या चक्षुतून, चारी वेद त्याच्या बुद्धीतून, अंतरिक्ष त्याच्या नाभीतून, द्युलोक त्याच्या मस्तकातून,भूमि त्याच्या चरणांतून आणि दिशा त्याच्या कर्णातून निर्माण झाले.

याखेरीज हा विराटपुरुष महाविष्णुपासून उत्पन्न झाला असून, त्याने सर्व प्राणीमात्रांना निर्माण केले आहे, असे म्हटले आहे.

पुरुषसूक्त हे पठन व पारायणाकरिता उपयुक्त मानले जाते.

षोडशोपचार पूजा करताना, अर्घ्य देताना, महाग्निचयनामध्ये अग्निचे आवाहन करताना आणि विष्णुयाग व मंत्रपुष्पांजली समयी या सूक्तांतील ऋचांचे पठण केले जाते.

***यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्|***
***तेही नाकं महिमान: सचंत यत्र पूर्व साध्या: सन्ति देवा||***

या ऋचा पुरुषसूक्तातीलच होय.

आता अध्यात्मातील ज्ञान, श्रध्दा, विवेक, आत्मा, परमात्मा आणि ब्रम्हाविषयीची ऋग्वेदातील सूक्ते पाहुया.

## १) श्रद्धा सूक्त

हे सूक्तही जगमान्य आणि महाप्रसिध्दही आहे. कारण हे सूक्त प्रभातवंदना,सरस्वती पूजन,जातककर्म आणि उपनयनासमयी नित्य पठण केले जाते.

ह्या सूक्ताची ऋषिका व देवता श्रध्दा कामायनी असून छन्द अनुष्टुप आहे. ही श्रद्धा कामायनी ऋषिका पंचमंत्रद्रष्टी मानली आहे.

ह्या सूक्तामध्ये श्रध्देची महती सांगितली आहे. हे सूक्त ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १५१ वे सूक्त आहे.

या सूक्तामध्ये अग्नि, इंद्,मित्र,वरुण,विश्वैदेव आणि साध्यदेवता अशा महान देवता व अन्य देवतांमधेही भेद नाही. यज्ञकर्म, कर्मकांड, पूजा, पठण इत्यादी सतोपासनेकरिता श्रध्देची अत्यंत आवश्यकता असते, असे सांगितले आहे.

ऋषिका श्रध्दा कामायनी या सूक्तामध्ये श्रध्दा या महातत्त्वाचे देवी रुपात आवाहन करुन सांगते की माते! तू आमच्या हदयात श्रध्दा उत्पन्न कर.

हे सूक्त पुढीलप्रमाणे:-

*श्रध्दायाग्नि: समिध्यते श्रध्दया हूयते हवि:|*

*श्रध्दा भगस्य मूर्धनि वचसा वेदयामसि||*

*प्रियम् श्रध्दे ददत: प्रियम् श्रध्दे दिदासत:|*

*प्रियम् भोजेषु यज्वस्वास्माकमुदितम् कृधि||*

*यथा देवा असुरेषु श्रध्दामुग्रेषु चक्रिरे|*

*एवं भोजेषु यज्वस्वास्माकमुदितम् कृधि||*

*श्रध्दां देवा यजमाना वायुगोपा उपासते|*
*श्रध्दां हदयाकूत्या श्रध्दया विन्दते वसु||*

*श्रध्दां प्रातर्हवामहे श्रध्दां मध्यदिनम् परि|*
*श्रध्दां सूर्यस्य निमुचि श्रध्दे श्रध्दोपयेह नः||*

या सूक्ताचा अर्थ असा आहे की श्रध्देनेच अग्निहोत्रात अग्नी प्रदीप्त होतो. श्रध्देनेच अग्निमध्ये हविची आहुती दिली जाते. मग म्हणजे धन, संपन्नता, विवाहाच्या देवतेच्या मस्तकावर आरुढ असलेल्या श्रध्देचे आम्ही आवाहन , स्ववाणीद्वारे- जी व्यक्तिव्यक्तिकडे पोहोचत आहे.

हे श्रध्दे! तू दात्याचे प्रिय कर! तू दातृत्वाची इच्छा, विचार, संकल्प करणाऱ्याचेही कल्याण कर. तू आमचे भोगांमध्ये, ऐश्वर्यामध्ये, यज्ञामध्ये कल्याण कर, अभ्युदय

कर. ज्याप्रमाणे देवतांनी असुरसंहाराकरिता स्वधेवर विश्वास, श्रध्दा ठेवली होती, तसेच हे श्रध्दे! तू भोजन, यज्ञ आदि ऋत्विजकर्मामध्ये आमचा उदय कर. देवगण, यजमान आणि वायुदेवाचे दिग्वपालही श्रध्देचीच उपासना करतात. मनात संकल्प असल्यानंतर सर्वजण श्रध्देलाच शरण जातात. श्रध्देकारणे धन प्राप्त होते.

आम्ही प्रातःकाळी श्रध्देचे आवाहन करतो, मध्यान्ही श्रध्देचीच उपासना करतो आणि सूर्यास्तासमयीही श्रध्देचीच प्रार्थना करतो. हे श्रध्दे! या मानव जीवनात आणि विश्वात आम्हाला श्रध्दामय कर.

अध्यात्मामध्ये अथवा जीवनामध्ये पूजा-अर्चना, पुण्यकर्मे अथवा ज्ञान ग्रहण करताना, जीवनातील कुठलेही कार्य करताना श्रध्दा, विश्वास, विवेक, बुद्धिमत्ता आणि कुशलता, विचार क्षमता ही हवीच. श्रध्दा किंबहुना विश्वास तो तर हवाच. तो विश्वास स्वतःवर, स्वतःच्या बुद्धिमत्ता-

क्षमतेवर असो अथवा परमेश्वरावर असो. विश्वास-श्रध्दा जीवनात असणे आवश्यक आहे.

गुरु अथवा परमेश्वरावर श्रध्दा, विश्वास हा हवाच, अन्यथा आत्मरुपाचा साक्षात्कार कसा होईल? आत्मस्वरुपाचे दर्शन व ज्ञान कसे घडेल? श्रध्दा असते(जीवनात) आवश्यक आहे, हेच या सूक्तात म्हटले आहे.

## ● सरमा सूक्त

हे सूक्त संवादपर सूक्ताच्या गणनेत आहे. सरमा देवशुनी आणि पणि (तस्कर,असुर) यांच्यामधील हे संवाद सूक्त आहे. हे सूक्त ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील १०८ वेळ सूक्त आहे. या सूक्ताचा छंद त्रिष्टुप् असून स्वर धैवत आहे.

या सूक्ताची ऋषिका सरमा देवशुनी असून देवताही तीच स्वयं आहे.

या सूक्तांमध्ये सरमा आणि पणिंचा संवाद आहे. पणिंनी इंद्रदेवाच्या गो-वृषभाचे हरण केले आणि बृहस्पतिच्या सुचनेनुसार सरमा या विदुषीला दूतिका करुन इंद्राने तिला पणिंकडे धाडले.

पणिंना असुर अथवा तस्करदेखील म्हटले जाते. मनुष्याची विकारवश इंद्रिये (मानवाचे स्वतःचे मन) ही पणिंप्रमाणे आपल्या आत्माला विन्मुख होऊन स्वार्थामध्ये रममाण

होतात, याचाच अर्थ गो-वृषभाचे हरण (मन:शांतीचे हरण) होते. ज्याक्षणी बृहस्पती जे ज्ञानाचे अधिष्ठाते असून, ते हे तथ्य समजून घेतात, त्याक्षणी देवशुनी सरमा मनुष्याला देवोन्मुख करण्याकरिता साहाय्यक ठरते.

***किमच्छन्ती सरमा प्रेदमानदूरे हयध्वा जगुरि: पराचै:|***
***कास्मेहिति: का परितक्म्यासीत्कत्थम् रसाया अंतर: पयांसि||***

***इन्द्रस्य दूतीरिशिता चरामि मह इच्छन्ती पणयो: निधीन्व|***
***अतिश्कदो भियसा तन्न आवत्तथा रसाया अतरं पयांसि||***

कीदृङिन्द्रः सरसे वा दशीकाश्यस्येदम् दूतीरसरः पराकात्|

आ च गच्छान्मित्रमेना दधामाया गवां गोपतिर्नो भवति||

नाहं तं वेद दभ्यं दभत्स यस्येदं दूतीरसरं पराकात्|

न तं गृहन्ति स्त्रवतो गभीरा, हता इन्द्रेन पणयः भायध्वे||

इमां गावः सरमे या ऐच्छः पारि दिवो अन्तोन्सुभगे पतन्ती|

कस्त एना अव सृजाद्युध्वयुतास्माकमायुधा सन्ति तिग्मा||

असेन्या वःपणयो वचांस्यनिशव्यास्तन्वः सन्तु पापीः|

अधृश्टो व एतवा अस्तु पन्था बृहस्पतिव उभया न मूलात्||

अयं निधीः सरमे आद्रिबुध्नो गोभिरश्वेभिवसुभिरन्यृश्टः|
रक्षन्ति तं पणयो ये सुगोपा, रेकु पदमलकमाजगन्ध||

एंह गमन्नृशयः सोमशिता,अयास्यो अगिंरसो नवग्वाः|
एतभूर्व वि भजना गोना, मथैतद्वचः पणयो वमन्नित्||

एवा च त्वं सरमे आजगन्थ प्रबाधिता सहसा देव्यैन|
स्वसार त्वा कृणवै मा पुनर्गा अप ते गवां सुभगे भजाम||

नाहं वेद भ्रातृत्व नो स्वसृत्वमिन्द्रो विदुरगिंरस च घोराः|
गोकामा मे अच्छदयन्यदायमपात इत पणयो वरीय :||

***दूरमित पणयोवरीव उद्गावो यन्तु मिनती ॠतेन।***

***बृहस्पतिर्या अविंदन्निगूल्हा: सोमो ग्रावाण ऋषयश्च विप्रा:॥***

या ऋचांचा अनुक्रमाने असा अर्थ आहे:-

ही ऋचा नियुक्त स्वरुपाची आहे. या ऋचेमध्ये असे दाखविले आहे की सरमा गर्जणाऱ्या मेघांतून उतरुन अंतरिक्षरुपी सरोवर नदी पार करत आहे. अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास एका देहातून (विशिष्ट आकाराच्या) दुसऱ्या शरीरात प्रविष्ट होणाऱ्या चेतनाशक्तीचे वर्णन हे आहे.

१) या ऋचेचा असा अर्थ आहे की हे सरमे! मी कालात्पर हे जाणून इच्छितो की तू या अशा दूर-दुर्गम मार्गावर कशाकरिता आली आहेस? हा मार्ग अज्ञानीपासून

अपरिचित असला तरी कोणी ज्ञानीजण या मार्गास पार करु शकतो. म्हणून हे विदुषी देवी! माझ्याकरिता काय आज्ञा आहे? मी तुला ही अंतरिक्ष नदी पार करण्यासाठी साहाय्य करु का?

२) या ऋचेचा असा अर्थ आहे, सरमा पणिंना हे सांगत आहे की हे पणिंनो! मी तुमच्याकडे असलेल्या गोनिधीची इच्छा करत- त्या इच्छेच्याच प्रेरणेने विचरण करत आलेली आहे. मला तुमच्या अत्याक्रमणाचे भय नाही. कारण इंद्र माझे सदोदित रक्षण करीत आहे आणि मी माझ्या संकल्पानेच या अंतरिक्षरुप नदीला पार केले आहे. त्याकारणे देवीदेवतांचा गोनिधी परत करावा, विषयोन्मुख होऊ नका, हेच मी सांगत आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास स्वधेची परमात्म्याची दूती-साक्षात चेतना इंद्रियाकडून प्रवृत्तीरुप महानिधी परत मागत आहे. तिला इंद्रियांच्या मायेचे भय नाही. म्हणून तिने संकल्पानेच देहांच्या आवरणाला पार केले आहे.

३) या ऋचेत पणि सरमेला म्हणताहेत की हे सरमे! तू ज्या इंद्राची दूती होऊन आमच्याकडे आली आहेस, तो इंद्र दिसायला कसा आहे, त्याची दृष्टि शक्ती कशी आहे, ज्याच्याकरिता तू या दुर्गम स्थानावर आली आहेस, ज्याक्षणी इंद्रदेव इथे येऊन आमच्या गोनिधीवर स्वामित्व प्रस्थापित करण्याचा प्रयास करेल, त्याक्षणी आम्ही त्याला आमच्या मधुर भाषणाने मित्र बनवून घेऊ.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास स्वधेची परमात्म्याची शक्ती न ओळखलेल्या इंद्रियांना असे वाटते की आपण

परमात्मालाही मायेच्या-मोहाच्या बंधनात अडकवू शकतो. मात्र हे सत्य नव्हे.

४) सरमा पणिंना या भीषण शब्दांत सांगत आहे की मी त्या प्रहाराला जाणत नाही,जो प्रहार इंद्र आपल्या दम्भक प्रहार शस्त्राने तुम्हां सर्वांवर प्रहार करेल, ज्याची मी दूती होऊन स्वर्गातून या साक्षात अंतरिक्षरुपी सरोवराला पार करून येथपर्यंत आले आहे, कारण इंद्राला कुणीही गुप्त करत नाही, त्याला कुणीही बंधनात बांधू शकत नाही, त्याला कुणीही आघात पोहोचवू शकत नाही, कारण इंद्रच आपल्या शत्रूंना आघात पोहोचवत असतो. म्हणून हे पणिंनो! सावधान! कारण इंद्राद्वारे मृत्यू प्राप्त झाल्यानंतर तुमची शवे पृथ्वीवर पडतील.”

ह्या ऋचेला आध्यात्मिक दृष्टीने पाहिल्यास हे जाणवते की चेतना शक्ती इंद्रियांना सावध करत आहे. कारण परमात्मा श्रेष्ठ, सर्वशक्तिमान आहे. स्वधेच्या सर्वबलसंपन्न प्रहारांपासून स्वयं इंद्रिये ही वाचू शकत नाही. ती इंद्रिये विषययुक्त आहेत. कारण तशी परमात्माचीच इच्छा आहे. याशिवाय इंद्रियांनी विषयत्याग करावा अशीही त्याचीच इच्छा आहे. जर स्वधेची आज्ञा इंद्रियांनी पालन नाही केले, तर त्यांचे दायित्व तीच स्वधा नष्ट करेल.

५) या ऋचेत पणि सरमेची स्तुती इंद्राला आव्हान देताहेत की हे सुभगे! हे सौभाग्य शालीनी, ऐश्वर्य वर्धिनी सरमे! ह्या गायी-चर्तुबाजूभोवती (ज्यांच्या) कठोर पहारा आहे, ज्यांची तू इच्छा करत द्युलोकांतून अंतरिक्षरुपी नदीला पार करून येथे आली आहेस. मात्र तुझा स्वामी इंद्र युद्ध न करता या गोपनिधीला आपल्या आधीन करु शकतो

का? याशिवाय आमची आयुधेही तीक्ष्ण आहेत, हे तू त्याला कथन कर.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास इंद्रियांना वाटते, त्यांचा मोह, माया अधिक शक्तिशाली आहे, ज्याचे आवरण परमात्मा ही दूर करु शकणार नाही. याबाबतीत ते गर्वित असले तरी, त्यांना वाटते की चेतना शक्ती त्यांना निष्प्राण करु शकते, म्हणून ते तिची स्तुती करु लागतात.

६) या ऋचेमध्ये सरमा पणिंना चेतावणी देत आहे की हे पणिंनो! तुमचे शब्द सेनाबलविरहित फक्त पोकळ कथने आहेत. तुम्ही सर्वजण शस्त्रसज्ज असूनही इषूरहित, बाणरहित, शस्त्र विरहित आहात. तुमचे शरीर पापमय आहेत, चौर्यकर्माकारणे. तुमच्या मार्गही सरलं असणार नाही जरी तुम्ही पलायनाचा विचार केलात तरी. वाक्

शक्तीचे स्वामी असलेले बृहस्पती तुमच्यावर मुळीच दया करणार नाहीत.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास इंद्रियांचा मोह, माया, विकार ही अस्त्रे पोकळ शब्दांप्रमाणे परमात्मा करिता बोथट आहेत. इद्रियांनी मनुष्याचे शरीर पापमय केले आहे. त्याकारणे इंद्रियांना परमात्माशी संघर्ष केल्यावाचून अन्य मार्ग नाही आणि जर इंद्रिये परमात्म्याला शरण नाही गेली, तरी परमात्मा त्यांची माया नष्ट करेल.

७) या ऋचेमध्ये पणि अहंकाराने सरमेला सांगत आहे की आम्ही देवतांकडून पळवून आणलेल्या गाई,मेघ, रत्न,अश्व तसेच रत्नांनी भरलेला निधी पर्वतामध्ये गुप्त स्थानी व कठीण गंतव्यामध्ये आवृत्त केलेला आहे. मात्र या निधीचे

संरक्षण गोरक्षा प्रमाणे बलदंड असलेले हे धष्ट-पुष्ट रक्षक करत आहेत. त्याकारणे इंद्रालाही येथे येणे शक्य नाही

तू व्यर्थ या स्थानी आली आहे. सूभगे! तू आमच्यासह देवतांचे सामजस्य साधण्याचा निरर्थक प्रयत्न करु नकोस.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास इंद्रियांना असे वाटते की त्यांची मोहमाया नष्ट करण्यासाठी व महासुख- परमानंद रूपी निधी ज्यात प्रवृत्तीही समाविष्ट आहे, हा निधी ग्रहण करण्यासाठी परमात्म्याला षडविकार, वासना, कामना अशा रक्षकांशी संघर्ष करावा लागेल. मात्र ते त्याला शक्य नाही. याशिवाय परमात्म्याला तो निधी शोधणेही अशक्य आहे. कारण तो निधी चित्तामध्ये खोल दडला आहे. मात्र त्या चित्तात जाण्याकरिता काम,क्रोध, मंद,मत्सर, सुखदुःखे, वैषम्य अशा भाव-भावनांच्या रक्षकांना पार करावे लागते.

८) या ऋचेत सरमा पणिंना पुनः चेतावणी देत आहे. पणिंच्या वचनांचा ‘वमन’ असेही म्हणत आहे. ती असे म्हणते आहे की हे पणिंनो! औषधीरस पान केल्यासारखे शक्तीशाली व तुमच्या कृत्याकारणे उद्विग्न झालेले अयास्य, अंगिरस आदि ऋषी, पृथ्वीच्या नऊ गतिदेवता, दिक्पाल, गति प्रेरक वायू तसेच अनंत देवता येथेच येतील व गोग्रहण करुन तुमच्या शरीराचे विभाजन करतील. त्याक्षणी तुम्हाला हे मान्य करावे लागेल की तुमचे वचन हे वचन नसून वमन (केवळ) होते.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास चेतना शक्ती विषययुक्त इंद्रियांना असे सांगत आहे की या शरीरात इंद्रियांच्या मोह, मायेचे आवरण नष्ट करण्यासाठी फक्त चेतना शक्तीच नव्हे तर औषधीरस ग्रहण केलेले प्राण, अपान, व्यानादि, पंचप्राण, शरीराच्या नऊ गति, शरीराच्या प्रत्येक अवयवांची रक्षण करणारी देवता (देवी कवचानुसार) शरारातील पवित्र

व सुगंधित वायु तसेच तिन्ही नाडयांची शक्तीही तुमच्या मायेचे-मोहाच विभाजन करेल. त्याक्षणी तुम्ही आपला विषय वमित कराल.

९) या ऋचेत पणि सरमेला विनंती करताहेत की “हे सुभगे! हे ऐश्वर्यशील सरमा देवशुनी! तुला विशेष प्रकारचे सामर्थ्य प्राप्त आहे. याशिवाय तू देवसबंधी असून त्यांच्या बलाचे अनुसरण करत प्रेरीत होऊन येथे आली आहेस. म्हणून आम्ही तुला आपली भगिनी मानत आहोत. तूच आमचे रक्षण कर. आम्ही तुला हवे तर आमच्या निधीचा महाभाग देऊ. तू कृपया देवतांकडे परत जाऊ नकोस, हे सुधनवती! आमची भगिनी होऊन आमचे रक्षण कर.”

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास इंद्रिये एकतर भयभीत झाली आहेत, परमात्म्याच्या कल्पनेने अथवा ते साम, दाम, दंड,

भेद या नीतीचा प्रयोग करताहेत, तेही चेतनाशक्तीवर! ते चेतना शक्तीला विनंती करुन तिला भगिनी मानत असे म्हणताहेत की परमात्म्याच्या बलाने प्रेरीत असलेली व सामर्थ्यशाली असलेली चेतना शक्ती! तू देवतांच्या शक्तीने या शरीरात आली आहेस, याशिवाय तुझा थेट परमात्म्याशी संबंध आहे. म्हणून आम्ही तुला इंद्रियांची भगिनी-सारयित्री अथवा चित्तेश्वरी मानत आहोत. याखेरीज तुला महासुखनिधीचा मोठा भागही देऊ. तू आमचे रक्षण कर.

या ऋचेमध्ये इंद्रीयांना असे वाटते की, आपण दूतिकेला-चेतनाशक्तीला प्रलोभन दाखवून तिला आपल्या पक्षात करवून घेऊ शकतो.

१०) या ऋचेत सरमा पणिंच्या प्रस्तावाला नाकारत आहे, कारण ती क्रुद्ध झाली आहे. ती क्रुद्ध होऊन म्हणत आहे की "हे पणिंनो! मी तुमच्या भ्रातुभावाला जाणत नाही अथवा

मानतही नाही. इंद्र, अंगिरसादि विद्वान ऋषि आणि त्यांचे घोर सैनिक तुमचाच वध करतील, तुमच्यावर आक्रमण करुन. कारण त्यांना गोनिधी इच्छित आहे, मात्र हे भगिनीचे नाते मला इच्छित वा मान्य नव्हे. कारण मी गोनिधीच्याच इच्छेनेच येथे आले आहे. म्हणून या गोनिधीचा त्याग करून या स्थानावरुन तुम्ही सर्वजण तत्काळ निघून जा. मी तुमचे रक्षण होण्याचा, हाच उपाय सांगू शकते."

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास चेतनाशक्ती इंद्रियांचे भ्रातृत्व व त्यांच्या प्रति स्वतःचे भगिनीत्व स्वीकारत नाही. ती एका उत्तम योगिनी व दूतिकेप्रमाणे आपल्या विचारांवर दृढ राहते. मात्र मी त्यांना त्यांच्या रक्षणाचा उपाय सांगते, तो म्हणजे आपल्या विकार-मायेचे आवरण दूर करुन प्रवृत्ती निधी परमात्माकडे सोपवण्याचा. कारण परमात्मा, शरीराच्या नऊ गती आणि अनंत प्राण इंद्रियांवर आक्रमण करुन इंद्रियांच्या

मायेचा-विकारांचा नाशही करु शकतात, ही चेतावणी ती देत आहे., पणिंनो! (इंद्रियहो!)

११) ऋचेत सरमा पणिंना अंतिम चेतावणी देत आहे की तुम्ही सर्व या स्थानावरुन अतिदूर-दूर निघून जा. जे सत्य व स्थिर असे ऋत आहे, ते जाणून घ्या. पणिनो! आणि ऋताच्या नियमानुसार हेच सत्य घडणार आहे की हा गोनिधी व सोम सदैव तुमच्या बंधनात राहणार नाही. मात्र याच बंधनाला भेदून या बधंनात दडलेला सोम व गायी शोधून काढून बृहस्पति, अविन्द, आदिवासी, विप्र आणि देवतांनी प्राप्त केले आहे, हेच समजून जा.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास चेतना शक्ती विकारांना (इंद्रियांतील) शरीरातून निघून जायला सांगत आहे. कारण इंद्रिये व विकार ऋताच्या नियमांना बदलू शकत नाहीत.

आणि हेच ऋत आहे की परमात्मा, त्यासह शरीराच्या नवं गति, ज्ञानरुपी मस्तिष्क, ब्रम्हरंध त्या बंधनांना, मायेला-विकारांना भेदून महासुखनिधी आणि प्रवृत्तनिधी प्राप्त करतील व या प्रवृत्ती सत्यज्ञानाकारणे सत्प्रवृत्ती होतील, मोक्षाप्रति मार्ग मुक्त होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# *संकल्पना*

## *सरमा (देवशुनी)*

सरमा या शब्दाची व्युत्पत्ती सृ या धातुपासून झाली आहे. सृ याचा अर्थ सृजनकर्ता किंवा सृजनकर्ती होय आणि देवशुनी म्हणजे देवतांची गति असणारी होय. तसेच आकाशातील विद्युतही.

याशिवाय चंद्रमणि विद्यालंकाराने आपल्या निरूक्त भाष्यामध्ये 'सरमा'या शब्दाचा अर्थ देववाणी देवतांसह सदैव अंतरिक्षात निवास करणारी असा केलेला आहे.

जयदेव विद्यालंकाराने ऋग्वेद भाष्यामध्ये 'सरमा' या शब्दाचा अर्थ अशा प्रकारे सांगितला आहे की आत्मिक चेतना,चित्तवृत्ति, विवेकबुद्धी म्हणजे सरमा.

ब्राह्मण पुराणामध्ये सरमेला कश्यप तसेच क्रोधाची कन्या मानले आहे.

महर्षि दयानंदनी ऋग्वेद भाष्यामध्ये विद्या, धर्म आदि बोधांना उत्पन्न करणारी माता असे वर्णन केले आहे.

## *देवशुनी*

देवशुनी म्हणजे देवतांच्या शुनी , श्वानांसह असलेली (हेरप्रमुख) म्हणजेच ह्या सरमाने तिच्या या हेर श्वानांसह असुरांकडे/पणिंकडे गमन केले आहे.

याचाच अर्थ, त्याकाळीही शत्रूंकडे जाण्याकरिता , त्याचा ठावठिकाणा शोधण्याकरिता एखाद्या दूतिका ,उपाध्याय अथवा अन्य हेरस्त्रीला हेरश्वानांसह पाठवण्याची पद्धत होती. म्हणजे हेरश्वान वास काढतील व त्यांना प्रशिक्षित व नियंत्रित करणारी हेरस्त्री-दूतिकाही त्यांच्या मागोमाग शत्रूंकडे जात असेल.

'शुन' या शब्दाचा अर्थ 'शुभ' असाही होतो. देवशुनी म्हणजे देवतांच्या लोकांत निवास करणारी आणि त्यांच्याकरिता शुभ असलेली होय.

याशिवाय ‘शुनी’ या शब्दाचा अर्थ वायु , आनंद,व शुन्य असाही आहे. देवशुनी म्हणजे देवतांचा प्राणवायू असणारी , त्यांच्याकरिता वायुप्रमाणे शीतल भासणारी , देवतांकरिता आनंददायक वाटणारी , स्वयं शून्य असणारी अशी दूतिका , सूचिका होय.

असे म्हटले जाते की ‘शनी’ या शब्दाच्या संचातील शुनी हा शब्द आहे. एका अर्थाने ‘शुनी’ या शब्दाचा अर्थ स्वामीशी एकनिष्ठ, प्रामाणिक असलेली याशिवाय पति , असुरांकरिता क्रुद्ध, क्षुब्ध, अत्यंत न्यायनिग्रही असलेली असाही होतो.

आणि ‘सरमा’ या शब्दाची व्युत्पत्ती येथे सांगाविशी वाटते ‘सरमि गच्छति इति सरमा’ जी दैवी, ईश्वरी, आध्यात्मिक, आधिभौतिक , अंतसूचके आणि नैसर्गिक संकेतांचे अनुसरण करत जीवनप्रवास करणारी होय.

# पणि

पणि या शब्दाचा अर्थ असुर, वाणिक् असा अर्थ होतो व मेघसूध्दा. याशिवाय जयदेव विद्यालंकार ने पणिंचा अर्थ 'इंद्रिये' प्राणासक्त,असा केला आहे.

आचार्य यास्कानी ऋग्वेदामध्ये पणिंचा अर्थ 'व्यवहार कुशल व्यापारी' असा केला आहे.

# शची पौलोमी सूक्त

हे सूक्त ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील १५९ वेळ सूक्त आहे. हे सूक्त ६ ऋचांचे असून ह्या सूक्ताची ऋषिका शची पौलोमी असून देवताही तीच आहे.

या सूक्तांमध्ये शचीचे सामर्थ्य दिसून येते, जे कुटुंबामध्ये व रणांगणामध्ये सिध्द होते. शची ही अभिमानी व बलशाली देवता आहे, हे दिसून येते.

शची ही अदितीची स्नुषणा, इंद्राची पत्नी, ऋषि पुलोनची पुत्री, वृषाकपि तसेच अन्य इंद्राणिची सपत्नी, तसेच जयंत, देवसेना व जयंतीची माता आहे. याशिवाय आदितीप्रमाणे ती वैदिक ऋषिकांची अग्रगण्या आहे.

याशिवाय महाभारताची महानायिका याज्ञसेनी पांचाली हीदेखील शचीचा अवतार मानली जाते आणि पांडव इंद्राचे अवतार.

पांचालीचेही महाभारतात जीवन-संघर्षामध्ये, वनांमध्ये तसेच कुटुंबामध्येही त्याप्रमाणे सामर्थ्य जाणवते. ती शचीप्रमाणे स्वतःची महत्ता ठराविक वेळीच पटवून देते.

त्याकारणे शची पौलोमी ही ऋषिकाही मला वागाम्भृणी ऋषिकाप्रमाणेच आत्माभिमानी वाटते, स्वतःच्या स्थानाची महत्ता राखून आचरण करणारी. तिचाच अवतार असणाऱ्या पांचालीचेही तसेच आचरण महाभारतात दिसून येते, आत्मसन्मानाने तसेच स्वस्थानाचे रक्षण करण्याचे.

ज्याप्रमाणे पांचालीने आपल्या पतिव्रात्याच्या शक्तिने आपल्या अन्य सपत्नींना अप्रत्यक्षपणे परास्त करुन महाभारतातील सत्यभामेच्या शब्दांप्रमाणे आपल्या पतीची मने जिंकून घेतली होती, त्याचप्रमाणे शचीने आपल्या सामर्थ्याने आपल्या अन्य सपत्नींना परास्त करुन आपल्या पतीचे-इंद्राचे मन जिंकले होते. म्हणून तिला 'महेन्द्रीही' म्हटले जाते.

याशिवाय या सूक्तात पुत्र व कन्येला समान स्थान दिले आहे. श्री आपल्या दोन्ही पुत्रींना पुत्रापेक्षा सर्वश्रेष्ठ स्थान तसेच महत्ता देण्याचा संकल्प ग्रहण करत आहे. याचाच अर्थ वेदांमध्ये पुत्रा पेक्षा पुत्रीला श्रेष्ठ स्थान दिले आहे, तसेच पुरुषांपेक्षा स्त्रीचा गौरव केला आहे. शची, पौलोमी, वागम्भृणी, श्रध्दा कामायनी अशा अनेक ऋषिका आहेत, ज्या ऋषिका स्वतःच्या आत्मस्वरुपाचे ज्ञान देऊन स्वतःची महती कथन करताहेत. त्या ऋषिकांनी स्वतःची किर्ती

सूक्तजगतात, रणांगणात आणि कुटुंबातही अधिक वर्धित केली आहे.

लौकिक अर्थाने पाहिल्यास हे सूक्त शचीची आत्मस्तुती करणारे अथवा तिच्या स्थानाचे, महतीचे, मातृत्व, सामर्थ्य तसेच किर्तीचे गुणगान करणारे आहे, असे वाटेल. असे वाटणे ही स्वाभाविक आहे व उचित ही.

मात्र अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास हे जाणवेल की जणु आदिशक्ती स्वधेच्याच सामर्थ्याची प्रशंसा करत आहे! या सूक्तातील ऋचांप्रमाणे संदर्भ घेतल्यानुसार शची अर्थातच देवी स्वधा हे सांगत आहे की सुर्य, केतु आदि तिच्याच इच्छेनुसार उगवतात. म्हणजेच संपूर्ण विश्वचक्र चालते. माझ्या इच्छेप्रमाणे उदात्त, प्रकाशमान. व शोकरहित घडते.

याचाच अर्थ ही विश्वोत्पत्ती करणाऱ्या स्वध्वेची स्तुतीच/ प्रशंसाच आहे.

हे सूक्त पुढीलप्रमाणे:-

***उदसौ सूर्यो अगादुदयं मामको भग:|***
***अहं तद्विद्वला पतिमभ्यसाक्षि विषासहि:||***

***अहं केतुरहं मुर्धाहमुग्रा विवाचनी|***
***ममेदनु क्रतुं पति: सेहानाया उपाचरेत्||***

***मम पुत्रा: शत्रुहणोथो मे दुहिता विराटा|***
***उताहमस्मि संजया पत्यौ मे श्लोक उत्तम:||***

***येनेंद्रो हविषा कृत्वभवद् द्युम्न्युत्तम:|***
***इथं तदक्रि देवा सपत्ना किलाभुवम्||***

***असपत्ना सपत्नघ्नी जयन्तभिभूवरी।***
***आवृक्षमन्यासां वर्चो राधो अस्थेयसाभिव ॥***

***समजैषमिमा अहं सपत्नीरभिभूवरी।***
***यथाहमस्य वीरस्य विराजनि जनस्य च ॥***

१) पहिल्या ऋचेचा असा अर्थ आहे की सूर्य उदित झाला आहे म्हणजे माझा भाग्योदय झाला आहे. मी शत्रूंचा विनाश करणारी असून पतिच्या विजयाची इच्छा करणारी असून, मी आपल्या सपत्नींना परास्त करुन माझ्या पतीला वश केले आहे. मी माझ्या पथातील बाधा ठरणाऱ्या असुरांचा संहार केलेला आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास आदिशक्ती स्वधेच्या कृपेने सूर्य तसेच भाग्याचा उदय होतो. तिच्याच इच्छेने हे विश्वचक्र चालते. काम, क्रोध, मद अशा अशा षडरिपुंचा पराभव करून ती पुरुषरुपी आत्म्याच्या इंद्रियांवर विजय इच्छित आहे. तसेच तिने वासना, कुविचारांना परास्त करून पुरुष रूपी आत्म्यावर स्वामित्व प्रस्थापित केले आहे.

२) या ऋचेचा असा अर्थ आहे की मी केतू आहे, मी मूर्धन्य आहे, मी ध्वजेप्रमाणे यश, वैभव, सन्मानाचे दर्शन घडवून झळकणारी आहे. माझी वाणी मधुर व उग्रही आहे. मी तेजस्विनी, असून देवतांची शक्ती आहे. मी शत्रूंना जिंकणारी सर्वश्रेष्ठ असून माझ्या मतांचा, शब्दांचा, तसेच संकल्पनाचे अनुसरण माझा पती करतो.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास आदिशक्तीच तेजोमंडल,आकाशमंडळ व ग्रहमंडळही आहे. तिचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. तिने यश, वैभव व सन्मानाचे सृजन केले होते तिचं वाणी आहे व तेजही. ती सर्व देवतांच्या, मानवांच्या व असुरांच्या शक्तीचा स्त्रोत आहे. ती विकारांना जिंकणारी परम प्रकृती असून तिच्या आज्ञांचे पालन स्वयम् पुरुष रुपी आत्मा करतो.

३) या ऋचेचा असा अर्थ आहे की माझे पुत्र जयंत आणि वसुक हे शत्रूंचे हनन व निर्दालन करण्याकरिता सक्षम आहे, माझी कन्या जयंती व देवसेना या उभयंता विराट, महान आहेत, तेज आणि बलाने परिपूर्ण,सर्वश्रेष्ठ आहेत, मी संजया (अपराजिता) आहे, माझा पती उत्तमोत्तम असून अजरामर आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास आदिशक्ती स्वधा असे म्हणते आहे की तिचे पुत्र म्हणजे मन आणि विवेक, शत्रूचे म्हणजेच विकारांचे मायेचे आवरण दूर करणारे आहेत. तिच्या कन्या म्हणजे बुद्धी व प्रतिभा ह्या उभयंता महान असून तेजवान आणि बलवती आहेत. याशिवाय ती स्वयम् अपराजिता परम प्रकृती असून पुरुषरुपी आत्मा उत्तमोत्तम व अक्षय आहे.

४) या ऋचेचा असा अर्थ आहे की देवतांनो! असे करावे की माझ्या पतीला व मला हवि प्राप्त व्हावा, माझा पती तेजाने परीपूर्ण व्हावा, त्याची शक्ती व किर्ती वाढावी, त्यांचा व माझा सदैव विजय व्हावा आणि मला या बाबींची प्रसन्नता आहे की मला अनेक सपत्नी असूनही मी असपत्नी झाले आहे. कारण मी माझ्या सपत्नींना परास्त केले आहे. त्याकारणे मी शोकरहित झाले आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास आदिशक्ती मनाच्या सत्प्रवृत्तींना असा आदेश देत आहे की हे सत्प्रवृत्तींनो! असे करावे की आत्माला किंवा मला दुष्ट विचार प्रवृत्तीची आहुती प्राप्त व्हावी, आत्मा तेजयुक्त व्हावा, विकारांवर मात करण्याची त्याची शक्ती वाढावी, कुप्रवृत्तीशी-विकारांची असलेल्या युध्दात त्यांचा व माझा विजय व्हावा. मला याचाच आनंद आहे की या प्रकृतीत वासना आणि कुविचार असूनही मी वासनाहिन आहे. कारण मी वासनांना पराजित केले आहे. म्हणून मी एक शुन्य आहे, शोकविरहित.

५) ऋचेचा असा अर्थ आहे की मी असपत्ना आहे. मी सपत्नींना पराजित केले आहे. मी अजातशत्रू आहे. कारण मी शत्रूंचा नाश केलेला आहे. मी जयंती आहे. माझा सदैव विजय होत असतो. मी अपवित्र विचार व अस्थिरतांच्या

समूळ नाश केलेला आहे. मी सपत्नींच्या नश्यमान शालीनता व शत्रूंच्या नाममात्र सज्जनतेकरिता ग्रहणस्वरूप आहे, ज्यांनी मला पूर्वी ग्रासण्याचा प्रयास केला होता.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास आदिशक्ती स्वधा ही वासनारहित असून वासनांना परास्त करणारी आहे. ती विकाररहित आहे कारण तिने विकारांचा नाश केलेला आहे. आदिशक्ती भगवतीला ‘जयंती’ असेही म्हटले जाते. याशिवाय तिने विचार आणि मनाला विचलित करणाऱ्या भावनांचा समूळ नाश केलेला आहे. आदिमाया ही वासनांच्या नश्यमान तीव्रता आणि विकारांच्या नाममात्र अस्तित्वाकरिता ग्रहणस्वरूप आहे, ज्याने तिला मानव रुपात असताना ग्रासण्याचा प्रयास केला होता.

६) ऋचेचा असा अर्थ आहे की मी माझ्या सपत्नींना जिंकून घेतले आहे. मी विजयिनी आहे. मी माझ्या सत्तेचा आणि शक्तीचा विस्तार केला आहे. म्हणून वीर इंद्रावर माझे प्रभुत्व आहे. माझी सत्ता माझ्या कुटुंबीयांवर आणि देवतांवर, स्वर्गावर आणि प्रजाजणांवर चालते. मी अनुल्लंघनीय शासन करणारी आहे. वीर पुरुषाची पत्नी वीरांगणा आणि वीर पुत्राची माता होऊन स्वर्गाच्या सिंहासनावर विराजमान झालेली आहे. माझ्या सामर्थ्य, श्रम,योग्यता, भाग्य आणि सत्तेकारणे मी प्राप्त केलेले हे स्थान अचल व अढळ आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास आदिशक्तीने विपरीत मानसिकतेचा डाव खेळलेला आहे. तिने साधकांना भ्रमित करून त्यांची परीक्षा घेण्यासाठी वासनांना आणि विचारांना आपल्या पक्षात केलेले आहे. अर्थात त्यांचे मन जिंकून

घेतले आहे म्हणून ती विजयिनी आहे. तिने आपली सत्ता व शक्ती विश्वावर विस्तृत केलेली आहे. म्हणून त्या परमप्रकृतीचे प्रभुत्व पुरुषरुपी आत्म्यावर आहे. तिची सत्ता प्रकृतीच्या प्रत्येक घटकावर देव, मनुष्य, प्राणी, वनस्पती, गंधर्व,यक्ष, किन्नर आणि तसेच मनाच्या प्रत्येक भावना, प्रेरणा, विकार, इच्छा- वासनांवर चालते. तिचे साम्राज्य म्हणजे हेच विश्वच आहे. आणि तिच्या शासनाचे उल्लंघन कोणीच करू शकत नाही. आदिशक्ती पुरुषरुपी आत्म्याची परमप्रकृती, बुद्धी-प्रतिभा व मन-विवेकाची माता होऊन जगताच्या सिंहासनावर विराजमान आहे. तिच्यात इतके सामर्थ्य शक्ती, योग्यता, सद्गुण आणि सत्ताप्रेरणा आहे,म्हणूनच जगाच्या संचलनाचे कार्य तीच करते.

अशा प्रकारे या सूक्ताला आदिशक्तीने केलेले स्व सामर्थ्य आणि शक्तीची 'आत्मस्तुती' म्हणून मांडले आहे.

असे माझे मत आहे की आध्यात्मिक दृष्टीने आदिमायेची सामर्थ्य-स्तुती आणि लौकिक अर्थाने शचीने स्वतःत्याच शक्तीचे केलेले स्तवन असे हे सूक्त नितांत आहे. त्याचप्रमाणे काही विद्वानांचे असे मत आहे की आदिशक्तीरुपी शची देवीच्या शक्तीचे स्तवन करणारे हे सूक्त- या सूक्ताला ‘शक्तीसूक्त’ असेही संबोधले आहे.

या ‘शक्तीसूक्ता’ चा अथवा ‘शची पौलोमी' सूक्ताचा पठणाकरिता उपयोग केला जातो. देवीवंदना, देवीची स्तुती, अग्निहोत्र करताना हे सूक्त विशेषतः पठण केले जाते. त्याकारणे हे सूक्त अत्यंत लहान अथवा कमी ऋचांचे असले तरी, अत्यंत महत्वपूर्ण आहे.

# *विश्ववरा आत्रेयी सूक्त*

काही विद्वानांची असे मत आहे की वैदिक काळापासून स्त्री ऋषिकांनी फक्त दांपत्यजीवन, दांपत्य सुख, विवाहासंबंधित स्त्री अथवा स्त्रीचे जीवन अथवा त्यासंबंधितच लिहिले आहे.

परंतु हे अर्धसत्य आहे, कारण वागाम्भृणी, आदिती, शची, सरमा, श्रध्दा-कामायनी, विश्ववरा इत्यादि ऋषिकांनी विश्वोत्पत्ती, सत्ताशास्त्र, आराधनाचे सिध्दांत तसेच कर्मसिध्दांत या सूक्ताद्वारेच रचले आहेत.

याशिवाय या स्त्री ऋषिकांनी असे सांगितले आहे की स्त्रीच्या साहचर्याशिवाय पुरुष जीवनात, युद्धात, वानप्रस्थात, संन्याश्रमात आणि सभेत, गृहात तसेच यज्ञातही अपूर्ण मानला जातो. स्त्रीला उचित मान,

सन्मान,आदर आणि साहचर्य दिल्याशिवाय पुरुषाला जीवनात कधीच साफल्य लाभणार नाही.

वैवाहिक जीवनात, युध्दात, सभा-समितीत, स्वतंत्र जीवनात, ब्रम्हचर्य-संन्यासात स्त्री-पुरुषाने कसे आचरण करावे हे तर या ऋषिकांनी सांगितले आहे. मात्र याशिवाय अध्यात्म जीवनातील कर्मसिध्दांत, ज्ञानसिध्दांत देखील मांडले आहेत.

असाच एक कर्मसिध्दांत विश्ववरा या ऋषिकेने रचला आहे. विश्ववरा ऋषिका अग्निदेवाची स्तुती करुन यज्ञ करत असताना विद्वानांचा सत्कार करत असते. त्याक्षणी तिच्या मुखातून उमटलेले अग्निस्तवन हेच विश्ववरा आत्रेयी सूक्त म्हणून प्रचलित आहे.

या सूक्ताची देवता अग्नि असून या सूक्ताची ऋषिका अत्रिकुळात जन्मलेली विश्ववरा आहे.

मी या ‘अग्निस्तवनला’ ‘कर्मसिध्दांत’ म्हटले आहे. कारण विश्ववरा ऋषिकेने यज्ञ हे कर्म करत असताना म्हणजे आराधनारुपी देवकर्म-करताना नित्यकर्म तसेच अतिथीचे स्वागत करण्याचे आद्यकर्मही केले आहे. त्याकारणे विश्ववरा कर्मस्वरुपा आहे.

आणि अग्नितत्व हे पवित्रता, पावकता, जाज्वल्य, धैर्य, क्रांती व तेजाचे प्रतीक आहे. याखेरीज अग्निमधूनच प्रत्येक देवतेला ‘हविष्य’ प्राप्त होते. अग्नितून अर्थातच यज्ञातून पतिव्रता पांचाली, कालीस्वरुपा रेणुका तसेच धृष्टद्युम्न आदि युगप्रवर्तकाचा जन्म झालेला आहे.

याशिवाय अग्निदेवता ही स्त्री आणि पुरुष उभय रुपातील आहे. स्त्री रुपात स्वाहा व पुरुष रुपात यज्ञदेव, अग्नि. म्हणून मी अग्निला ,आराधनेचा साधनेचा, पवित्र व निष्काम संकल्प असे म्हटले आहे.

आणि ही ऋषिका विश्ववरा यज्ञ करताना तसेच विद्वतजनांचा सत्कार करताना सूक्त (उत्तम वचन) म्हणते आहे. ‘यज्ञ’ व ‘अतिथीसत्कार’ ही दोन्ही रुपके आहेत. ‘यज्ञ’- कर्मयज्ञाचे द्योतक आहे. यज्ञ हे त्यागाचे, हविष्याचे. बलिदान, क्रांतीचे स्वरुप आहे. यज्ञाद्वारेच सर्व देवता ना आहुती व हविष्य प्राप्त होते म्हणजेच यज्ञाद्वारे अन्य देवतांना प्रसन्न करता येते. यज्ञ हेसुद्धा कर्मस्वरुप असून लाभदायकही आहे. अतिथी सत्कार म्हणजेच विद्वतजनांचा स्विकार याचाच अर्थ उत्तम इच्छांचा, सदिच्छांचा तसेच शुभत्वाचा स्वीकार होय.

म्हणूनच तत्वज्ञानात, हिंदू वैदिक अन्वीक्षिकीमध्ये आणि अध्यात्मामध्ये कर्मयोग, कर्मसिध्दांत, यज्ञ, सदिच्छा, शुभत्व अतिथी अथवा विद्वतजनांचा सत्कार ही कर्मे अत्यंत महत्त्वाची, शुभ आणि आवश्यक सद्कर्मे मानली जातात. इतकेच नव्हे, पाश्चात्य तत्त्वज्ञानामध्ये शुभत्व व तसेच

सदिच्छांना महत्त्व दिले आहे. याखेरीज भारतीय हिंदू वैदिक संस्कृती आणि हिंदू तत्वज्ञान तर यज्ञव्यवस्थेवरच आधारित आहे. आणि आपली संस्कृती स्वयम् शुभ असून ग्रहण, अध्ययन, आचरण, प्रसरण आणि जीवनोदयीकरणाकरिता अत्यंत इष्ट आहे. त्याकारणे स्वयम् साध्यरूप व साधनरूप आहे.

ऋषिका विश्ववरा उष:काळाच्या पूर्वी जागृत होऊन नित्यकर्मे आजिविका म्हणजे उपजिवीका कार्ये करण्याचा उपदेश देते आहे. कारण उष:काली जागृत झाल्यावर अग्नि आणि आदित्याच्या कृपादृष्टीने मानवाच्या सदिच्छा पूर्ण होतात.

विश्ववरा सूक्ताच्या ऋचा पुढीलप्रमाणे:-

समिध्दो अग्निदिर्वि शांचिरश्रेत प्रत्यंडुषसमुर्विया विभाति|

एति प्राची विश्ववरा नमोर्भिदेवो इलाना हविषा घृताची ||

समिध्यमानो अमृतास्य राजसि हविष्कृण्वन्तं सचसे स्वस्तये|

विश्वं स धत्ते द्रविणम् यमिन्वस्यातिथ्यमग्ने नि चधत्त इत् पुरः||

अग्ने शर्ध महते सौभागाय तव द्युम्नान्युत्तमानि सन्तु|

सं जास्पत्यम् सुयममा कृणुष्व शत्रुयतामभि तिष्ठा महांसि||

*समिध्दस्य प्रमहसोग्ने वन्दे तव श्रियम्।*

*वृषभो द्युम्नवा असि समधरेध्दिदध्यसे॥*

*समिध्दो अग्न आहुत देवान् यक्षि स्वध्वर।*

*त्वं हि हव्यावलासि॥*

*आ जुहोता दुवस्यताग्निं प्रपत्यध्वरे।*

*वृणीध्वं हव्यवाहनम॥*

१) या ऋचेचा असा अर्थ आहे की विश्ववरा ऋषिका, अत्रि आणि अनुसया यांची कन्या-जिला प्राची म्हणजे उष:काल असेही म्हटले जाते, अशी प्राची अथवा विश्ववरा आदित्य आणि अग्निचे आवाहन करताना असे म्हणते आहे, हे अग्निदेवा! तू अत्यंत दयाळू आहेस. तू ज्वालांनी

प्रज्वलित असून तू अतंरिक्ष आणि स्वर्गाला प्रकाशित करतोस. तू उष:कालासमोर म्हणजे प्राची असलेल्या माझ्यासमोर यज्ञकुंडात प्रकट हो. कारण मी पूर्वाभिमुख होऊन द्युतिमान असलेल्या अग्निदेवाचे हवि आणि घृताद्वारे आवाहन करते आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास कर्मस्वरूप असलेली विश्वाला कर्म करण्यासाठी कर्माच्या संकल्पाचे, त्याच्या पवित्र सूक्ताचे आवाहन करत आहे. तिला उष:काल अथवा प्राची असे म्हटले आहे. कारण उत्तम आणि पवित्र कर्मातील जीवनाच्या आणि भाग्याचा उदय होतो.

ती अशी म्हणते आहे की कर्माचा हा पवित्र संकल्प प्रज्वलित अग्नी प्रमाणे पवित्र, तेजस्वी आणि उत्तम असावा. तो संकल्प असा असावा की त्या कर्माच्या संकल्पाने संपूर्ण जगतातल्या सर्वांना मार्गदर्शित केले

पाहिजे. त्या संकल्पाची कीर्ती सर्वदूर पोहोचली पाहिजे. कर्मस्वरूपा ही कर्म संकल्प ग्रहण करणारी असते. याशिवाय उष:कालाप्रमाणे कर्मस्वरूपाही असून पूर्वाभिमुख असून कर्माकरिता त्याग आणि दान तसेच अतिथीसत्कार करणारीही असते. (हवि व घृत यांची रुपके)

२) या ऋचेचा असा अर्थ आहे की ज्यावेळी हा अग्नि अधिक दीप्तीमान होतो, त्यावेळी हविष्य देणारा व्यक्ती अमर प्रतिभेचा स्वामी होतो आणि सर्व कला विद्या त्यालाच शरण जातात. हा पवित्र अग्नि त्याच व्यक्तीला शांती, समाधान, आनंद, उल्हास आणि ममत्व देतो, जो हविष्य (वारंवार) देतो. हा यजमान आणि यजोमती-त्याची पत्नी कीर्ती, बुद्धी आणि प्रतिभा इत्यादींनी श्रीमंत होतो. हे अग्नि देवा! अशीच एक यजोमती- मी यज्ञ करता करता आणि

आतिथ्य करता करता ते आतिथ्य तुझ्यासमोर व त्यानंतर तुझ्यातच प्राप्त केले आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास कर्माचा संकल्प अधिक प्रबळ आणि पवित्र झाला असता व्यक्तीला कर्म करण्यासाठी प्रेरणा, शक्ती, बुद्धी प्रतिभा प्राप्त होते. त्याचे कर्म श्रेष्ठ व पवित्र असल्यास त्याला सर्व प्रकारच्या सिद्धी प्राप्त होतात. कर्माचा संकल्प (पवित्र) त्याच व्यक्तीला कर्मामध्ये समाधान, आनंद, शांती, उत्तम फल आणि उल्हास देतो, जो कर्माचा कविता संकल्प पूर्ण करण्यासाठी त्याग करतो. त्याच्या पवित्र श्रेष्ठ अशा पुण्यकर्म,सत्कर्मांचा लाभ फक्त त्याच व्यक्तीला नव्हे, तर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला, मित्रपरिवाराला प्राप्त होतो. त्या कर्मांची पुण्याई त्या व्यक्तीसह त्याच्या परिवाराच्याही लेखाजोख्यात जमा होते. कारण असे म्हटले जाते की पतीच्या कर्मांची फलिते

पत्नीला, पुत्रांनी कर्मांची फळे पित्याला, तर त्याच्या कर्मांची फळे पुत्रांना प्राप्त होतात.

याशिवाय कर्म स्वरूपा प्राची विश्ववरा- जी कर्मा करिता त्याग करते आहे. ती म्हणते आहे की कर्म करता करता आणि दाने करता करता मी हे पाहते आहे की दान, त्याग आणि कर्म हे सर्वकाही कर्मांचा पवित्र संकल्पातच सामावलेले आहे.

तर या ऋचेत दान, त्याग आणि कर्म संकल्पात ऐक्य दाखविले आहे.

३) या ऋचेचा असा अर्थ आहे की हे अग्नि! तू आपल्या साधकांना महान सौभाग्य प्रदान कर. उत्तम धन, गृहस्थीने समतुलित सुखदेव, सर्वविध शत्रूंचा विनाश कर. तुझा

प्रकाश आणि तेज सदैव उत्तम व प्रज्वलित राहो. तू दांपत्य संबंधाला दृढ व सुनियमित कर व आमच्याशी शत्रूता करु पाहणाऱ्याचे तेज नष्ट कर. माझे गृहस्वामित्व दृढ राखू दे. तू शत्रूच्या कामना-वासनांचे हरण कर आणि माझे माझ्या पतीस नियंत्रित करण्याचा शुभाशीष दे.

या ऋचेत एक विशेष आढळले आहे, की ते म्हणजे स्त्री त्यांनी 'गृहस्वामिनी' दाखविले आहे, याशिवाय पतीसह संपूर्ण कुटुंबाचे संचालन व नियंत्रण करणारीही स्त्री (गृहिणीच) आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, कर्मस्वरूपा कर्मसंकल्पाचे आवाहन करते आहे की हे कर्माच्या पवित्र संकल्पा! तुझ्याकारणेंच लोकांच्या कर्माची उत्तम फलित तर स्वयं त्यांना सुभाग्य प्राप्त होते. कर्मसंकल्प उत्तम आणि पवित्र असल्यास कुणालाही उत्तम धन आणि गृहस्थीचे सुख प्राप्त

होते, तसेच त्रिविध तापांचे व दुःखाचे निवारण होते. कर्माच्या संकल्पाचे तेज, पावित्र्य व शुध्दता तशीच राहणे आवश्यक आहे. त्याकारणे कर्म आणि संकल्पाचे नाते दृढ होते. आणि उत्तम कर्मांमध्ये व्यवधान ठरणाऱ्या दुष्ट आसुरी शक्तीचे निर्दालन होऊन त्यांच्या दुष्टेच्छाही नष्ट होतात. मनुष्याचे आपल्या इंद्रिये, भावनांवर उत्तम नियंत्रण राहते व जीवन सुखकर होते.

४) या ऋचेचा असा अर्थ आहे की हे अग्नि! ज्याक्षणी तू तुझ्या प्रकाशाचा महानतेने, तेजाच्या वैभवाने प्रज्वलित व प्रकाशित होतोस. त्याक्षणी मी तुझ्या सामर्थ्याने उत्तेजित आणि अधिक शक्तिशाली होऊन तुझे पूजन करते. तू वैभवशाली असून सौंदर्यवान आहेस. तू द्युतिमान अशा वृषभ (नर योद्धा) आहेस आणि यजमान तसेच यजोमतीच्या यज्ञामध्ये, तीर्थयात्रेमध्ये, संन्यासामध्ये सहकर्मी,

सहयात्रेकरु आणि सहधर्मी म्हणून सहाय्यभूत ठरतो आहेस. याशिवाय तूच स्वर्गातील ज्वलंत प्रकाशाने तळपणारा अग्निदेव आहेस. तूच पवित्र संस्कारांनी भृत आहेस.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास कर्माचा संकल्प जेव्हा अधिक पवित्रतेने, तेजाने आणि प्रबलतेने झळाळतो, तेव्हा कर्म स्वरूपा- जी स्वयं सर्वशक्तिमान आहे, तिला कर्माच्या अधिक प्रबल झालेल्या संकल्पाकारणे कर्म करण्यासाठी अधिक उत्तेजना, शक्ती, प्रेरणा व स्फूर्ती प्राप्त होते. त्याकारणे ती उत्तम अशी अधिकाधिक सत्कर्म करते. याखेरीच ती अनेक देवतानांही प्रसन्न करते. कर्माच्या संकल्पनाचे वैभव, सौंदर्य, तेज पवित्रता आणि शुद्धत्व आगळेच असते. कर्माचा संकल्प हा तेजस्वी योध्दयाप्रमाणे आहे. कारण कर्माचा संकल्प आणि त्यासंबंधित कर्म संघर्ष, युद्ध, दुविधा, समस्या व दुःखामध्येही साथ देतो. याखेरीज कर्माचा

संकल्प यजमान- यजोमतीच्या यज्ञ कर्मामध्ये म्हणजे त्यागामध्ये, तीर्थयात्रेमध्ये म्हणजे अध्यात्माच्या साधनेच्या पवित्र प्रवासामध्ये आणि संन्यास (विरक्तीमध्येही) सहकर्मी, सहयात्रेकरु, आणि सहधर्मी म्हणून सहाय्यभूत ठरतो व फलप्राप्तीतही. याशिवाय कर्म संकल्प आणि त्यासंबंधित कर्म अत्यंत तेजस्वी,सत्प्रेरीत, पवित्र, अति उत्तम व कल्याणकारी असल्यास ते स्वर्गातही स्वतःच्या तेजाने तळपते. त्याकारणे ते पवित्र संस्कार व कर्मांनीच लिप्त असते.

५)या ऋचेचा असा अर्थ आहे की हे अग्नि! तू माझ्या आवाहन आणि याजकर्मांनी प्रज्वलित झाला आहेस. तू माझ्या देवतांनी ही यज्ञाला सन्मान दिला आहे. कारण तू भविष्य व अर्पण वाहक आहेस. याशिवाय ब्राम्हणांच्या पूजन कर्मात, यात्रेकरुंच्या यात्रेत, संन्यासाच्या धर्मातही

यज्ञच सामावलेला आहे. याखेरीज पत्नीने पतीच्या प्राजपत्य अग्नीचे संरक्षण केले पाहिजे. प्रजापती अग्नि म्हणजे कामनेचा, सृजनतेचा, तेजाचा, धैर्याचा, पवित्रतेचा महान अग्नि, अग्नि तत्व. त्याकारणेच ती उत्तम संतान, कीर्ती, पवित्रता, उत्तम संस्कारांची तसेच तेजाची अधिकारी होते.

या ऋचेत स्त्रीच्या शक्तीची महत्ता गेय केली आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास, स्त्री म्हणजेच शक्तीचे सामर्थ्य यात दाखवले आहे. प्रकृतीविना पुरुष अपूर्ण असतो , हे दाखवले आहे. अथवा चेतनाशक्तिविना आत्मा अपूर्ण असतो तसेच वाकशक्तिशिवाय परब्रह्म.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास या ऋचेचा असा अर्थ आहे की कर्मस्वरुपेच्या आवाहन म्हणजेच दृढनिश्चय व

त्यागकर्माकारणे-अनासक्तीकारणे कर्मसंकल्प अधिक प्रबळ झाला आहे. कर्मस्वरुपेच्या समर्पण व बलिदानाकारणे तिचे कर्म व त्याचा संकल्प अधिक तेजस्वी झाला आहे. म्हणूनच अध्यात्मात 'कर्म' यज्ञाला अधिक महत्त्व दिले आहे. कारण कर्माचा संकल्प पुण्यवाहक असतो. याशिवाय ब्राम्हणांच्या पूजन कर्मात यात्रेकरुंच्या यात्रेत (साधकांच्या साधन प्रवासात), विरक्तीच्या निर्मोहातही उत्तम कर्म आणि पवित्र संकल्प निहीत आहे. याशिवाय पत्नीने पतीच्या अर्थात आदिशक्तीचे आदिपुरुषाच्या , प्रकृतीने पुरुषाच्या, चेतना शक्तीने आत्माच्या तसेच वाक् ने परब्रम्हाच्या कर्माच्या संकल्पाचे रक्षण केले पाहिजे. तसेच सृजकता , तेज , ओज , किर्ती, धैर्य, पवित्रतेचेही. त्याकारणेच आदिशक्ती, प्रकृती, चेतना शक्ती आणि वाग्शक्ती उत्तम सृजकता , पवित्र किर्ती तसेच द्युतिमान तेजाच्या अधिकारीणी झाल्या आहेत.

६)या ऋचेचा असा अर्थ आहे की ज्याक्षणी यात्रेकरु , यजमान-यजोमती , संन्यासी-सन्यासीनी आपापल्या मार्गाने जात असतात, तीर्थयात्रा, यज्ञकर्म. संन्यस्त होत असतात. त्याक्षणी त्यांनी अग्निची सेवा केली पाहिजे. देवतांना नैवेद्य दिला पाहिजे, यथाशक्ती दान दिले पाहिजे, अर्पण वाहन (हविष्य) दान केले पाहिजे. पत्नीने पतीच्या प्राजपत्य अग्नीचे रक्षण केले पाहिजे. याशिवाय यज्ञाकरिता कोणती हविष्य प्रदान केली पाहिजे व त्यांचे परिणाम/फलिते काय असतील यज्ञामध्ये कोणकोणत्या सामुग्रीचा प्रयोग केला पाहिजे. ज्याकारणे आमचा या कार्य यज्ञाचा उद्देश सिध्द व सफल झाला पाहिजे या मूलभूत प्रश्नांची या ऋचांमध्ये चर्चा केली आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास अध्यात्म यात्रेचा यात्रेकरु (साधक) कर्मयज्ञाचा यजमान-यजोमती , विरक्त असलेले

स्त्री-पुरुष आपापल्या मार्गाने जात असतात, त्याक्षणी त्यांनी अग्निची म्हणजे कर्म आणि कर्मसंकल्पाची सेवा केली पाहिजे, त्याचे जतन केले पाहिजे. आत्मा रुपी ईश्वराला सुविचारांचा नैवेद्य दाखवावा, यथाशक्ती दान केले पाहिजे. पत्नीने पतीच्या, आदिमायेने आदिमायिनच्या , वाक् शक्तीने परब्रम्हाच्या सृजकतेचे , तेज , ओज , किर्ती , धैर्य व पवित्रतेचेही संरक्षण केले पाहिजे. म्हणूनच स्त्रीशिवाय पुरुष अपूर्ण असतो.

याशिवाय कर्म करण्याकरिता कोणते त्याग करावे , कशाप्रकारे समर्पण करावे, त्याची फलिते तसेच कर्माच्या हेतूंचा (ज्याकारणे कर्मसिध्द होईल) विमर्श केला आहे.

कर्मस्वरुपेची प्रभात मानली जाणारी विश्ववरा ह्या आत्रेयी (अत्रिऋषीच्या कन्येने) ऋषिकेने रचलेले हे सूक्त ‘अग्निसूक्त’ ‘अनलसूक्त’ अथवा ‘याज्ञसूक्त’ म्हणूनही

जाणले जाते. हे सूक्त अग्निची स्तुती करणारे आहे. त्याकारणे यज्ञकर्मामध्ये, होत्रात आणि आहुती देताना ह्या सूक्ताचा प्रयोग केला जातो. हे सूक्त अत्यंत शुभ असून फलदायक व प्रेरक आहे.

विश्ववरेप्रमाणे अत्रिऋषी-देवी अनुसूयेच्या अनृय पुत्रींनी- अपाला, विश्यंती आदि ऋषिकांनीही मनुष्याच्या धर्मपालनाकरिता प्रेरीत करणारी अनेक सूक्ते लिहिली आहेत.

## *रात्री सूक्त*

हे रात्रि सूक्त ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १२७ वे सूक्त आहे. या सूक्ता मध्ये आठ ऋचा आहेत. या सूक्ताचा ऋषी भारद्वाज आणि त्याची पुत्री (पुत्रीचे नाव काली अथवा रात्री आहे) असून या सूक्ताची देवता रात्री आहे, छंद गायत्री असून हे सूक्त नित्यपठणोपयोगी आहे.

या सूक्तात असे सांगितले आहे की रात्री देवता ही जगातील सर्व जीवांच्या शुभ-अशुभ कर्माची साक्षी असून तदनुरूप फळ-फलिते देणारी आहे. ही देवता त्रिलोकात व्याप्त आहे आणि आपल्या ज्ञान युक्त ज्योतीने जीवांच्या अज्ञानाचा अंधकार नष्ट करणारी आहे. याशिवाय साधकांना, व्यक्तींना भ्रमित करणारी तीच आहे. तिचं करुणामयी अंकावर (मांडीवर) प्रत्येक जीव सुखपूर्वक, शांतीपूर्वक निद्रिस्त होतो.

हे सूक्त देवी सप्तशती, देवी महात्म्य,देवी पूजनासमयी, देवी सूक्त, श्रीसूक्त, वाक् सूक्त, तंत्रोक्तम् सूक्तासह पठण केले जाते. रात्री सूक्ताचे तंत्रोक्त सूक्तही देवी सप्तशती मध्ये आढळते. रात्री सूक्ताचे आराधन-पठण काही साधक रात्रीही करतात. या सूक्ताकारणे निद्राक्षय, निद्रानाश, स्वप्नदोष निद्रेमध्ये मूत्र उत्सर्जन इत्यादी दोषांचे निवारण होते. हे असे दोष आहेत, ज्या दोषाकारणे मानसिक व्याधी, शारीरिक व्याधी उद्भवू शकतात. या सूक्ताच्या पठणाने अशा अनेक दोषांचे निवारण होते.

या सूक्ताची ऋषिका रात्रीदेवी स्वयं असून ती ऋषि भारद्वाजांची एकुलती एक कन्या आहे. ही कन्या ऋषी भारद्वाजांची कन्या असल्याकारणाने ह्या रात्री देवतेला 'भारद्वाजी' असेही म्हटले जाते. रात्री देवी हीसुद्धा वागाम्भृणी, शची, पौलोमी, आदिती, सरमा, श्रध्दा,

विश्ववरा या ऋषिकांप्रमाणे मंत्रद्रष्टी अग्रगण्या ऋषिका मानली जाते.

हे सूक्त अल्पाक्षरी असून त्यात गहन आशय सामावलेला आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास रात्री ही देवता रात्री, अधंकार, मनाचा कारक-चंद्र, कर्मफलदाता अथवा न्यायकारक-शनि, आकाश, इन्दुशकल आणि ग्रहणाची देवता आहे. रात्री म्हणजे सायंकाळ, रात्री. अंध:कार म्हणजे अज्ञानातून ज्ञान, तमसो माजोत्यिगर्मय-हे बृहदारण्यक उपनिषदातून ,पचमान अभयारोह मंत्र-सोमयाज्ञ मंत्र येथे तंतोतंत लागू होते.

त्यानंतर मनाचा कारक-चंद्राविषयी विवेचन पाहूया. ज्योतिषशास्त्रात आणि खगोलशास्त्रातय मनाचा कारक-चंद्र हा ग्रह (खरे पाहता पृथ्वी भोवती परिक्रमा करणारा सोम)

मानला जातो. चंद्राला सोम, सुधांशु, इंदु, नक्षत्रेष, विश्वू (विधाता) असेही म्हटले जाते. सुधा आणि सोम म्हणजे अमृत, नक्षत्रेष म्हणजे नक्षत्रांची असलेला.

शनि या शब्दाची व्युत्पत्ती पाहिल्यास शनैः वा क्रियापदाचीत 'शनि' या शब्दाचा उदय झाला आहे. शनैः या क्रियापदाचा अर्थ हळूहळू चालणे. शनि या शब्दाचा अर्थ हळूहळू चालणारा ग्रह आहे. (परिक्रमा करणारा) ऋग्वेदात अथवा वेदांच्या शनीला सुर्याची परिक्रमा करण्यासाठी साडेसात वर्षे लागतात म्हणून शनि हा एका राशीत साडेसात वर्षे राहतो. म्हणून त्याला साडेसाती म्हणतात. ही साडेसाती आपल्या सत्वाची, धैर्याची परीक्षा करण्यासाठी असते.

आकाश म्हणजे व्योम, आभाळ, गगनमंडल. व्योम चार अर्थ आकाश, उच्च शिखर अथवा गगनमंडल इत्यादी होय.

इन्दुशकल म्हणजे चंद्रकोर, अस्थिरता आणि स्थैर्याचे प्रतिक होय. आणि ग्रहण म्हणजे विकारांच्या, कामनांच्या साहाय्याने साधकांना भ्रमित करणे.

म्हणजेच अज्ञानातून उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाची, विश्रांतीची, मनाची, विधानाची, अमृत आणि नक्षत्रांची, न्यायाची, गतिची आणि उच्चशिखराची, स्थिरता-अस्थिरतेची देवता ही रात्री देवता आहे.

या सूक्ताच्या ऋचा पुढीलप्रमाणे:-

ॐ रात्री व्यख्यदायती पुरुत्रा देव्यक्षभिः|

विश्वा अधिक श्रियोधित||

ओर्वपा अमर्त्यानिवतो देव्युद्वतः|

जोतिषा बाधते तम्:||

निरु स्वसारमस्कृतोषम् देव्यायती|

अपेदु हासते तम्:||

सा नो अद्य यस्या वयं नि ते यामन्नविक्षामहि|

वृक्षे न वसति वयं:||

नि ग्रामासो अविक्षत् नि पद्वन्तो निपक्षिण :|

*नि श्येनासच्छिदर्धिन:||*

*यावया वृक्यम् वृकम् यवय स्तेनमूर्म्ये|*

*अथा न: सुतरा भव||*

*उप मा पेपिशत्तम: कृष्णम् व्यक्तमस्थित|*

*उष ऋणेव यातय||*

*उप ते गा इवाकरम् वृणीष्व दुहितर्दिव:|*

*रात्री स्तोमम् न जिग्युषे||*

१)या ऋचेचा असा अर्थ आहे की प्रणवासह रात्रीदेवीचे आवाहन केले जाते आहे. हे रात्री देवी! तू कालीदेवतेचे स्वरुप असून अनेक देशांवर नक्षत्ररुपांनी आपले कृपाछत्र

धारण करुन तू संपूर्ण विश्वाकडे पाहत असतेस. तू सर्व प्रकारच्या शोभा-सौदर्य धारण करणारी आहेस. तू सर्व जगताला प्रकाशित करतेस व जीवांच्या शुभाशुभ कर्मांना धारण करून त्यांच्या फलितांची व्यवस्था करणारी आहेस. तू प्रकाश व रश्मीला धारण करतेस.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास जी आदिशक्ती आहे, तीचे स्वरुप काली रात्री अथवा कालरात्री आहे. तीच मूळ आदिम अधंकार आहे आणि प्रकाशही. त्याकारणे सर्व लोकांच्या उद्गमाचे स्थान आणि अंतिम गंतव्य (मोक्ष स्थान) आहे. ती सर्वव्यापी असून तीच विकारबंधन, मायाबंधन आणि त्रिविध तापांपासून मुक्ती, मोक्षालाही नियंत्रित करते. आदिमाया रात्री ही महतत्वाच्या रुपाने सर्व इंद्रियांवर, प्रवृत्तीवर आणि आत्मावर-मनावर कृपाछत्र धारण करते. तिची दृष्टी सर्व जगतावर आहे. ही रात्रीदेवी प्रत्येक नश्यमान

वस्तू आणि सद्वस्तूला प्रकाशित करते. ह्या रात्रीरुपा देवीने निर्माण केलेल्या जगतातील प्रत्येक जीवांच्या शुभाशुभ कर्मांचे आणि त्यांच्या फलितांचेही नियमन तीच स्वयं करते. ती विभिन्न सत्प्रवृत्तींना धारण करणारी आहे.

२)या ऋचेचा असा अर्थ आहे की रात्रीदेवी शाश्वत आहे, अमर आहे. सृष्टी आणि प्रलयानंतरही तिचे अस्तित्व आहे , संपूर्ण विश्वाला ही व्यापून राहिली आहे. संपूर्ण विश्वाला लपेटणारी लताही तूच आहे. हे देवी! तू लता-पल्लवींना , गगनचुंबी वृक्षांनाही व्यापून राहिली आहेस. हे ज्ञानमयी आपल्या ज्ञान शलाकेने अंधकाराचा नाश करणारी आहेस. तूचं विशाल आकाशाला आणि पृथ्वीलाही व्यापले आहेस. तूच ग्रहणे निर्माण करणारी असून नक्षत्रांच्या साहाय्याने या ग्रहणांना नष्ट करणारे आहेस.

असे म्हणतात थॅलेस आणि ॲनॅक्झिमीनस/मींडर याने ग्रहणांचा शोध लावला. मात्र त्याचपूर्वी कित्येक वर्षांपूर्वी ऋषिका रात्री/ काली आणि ऋषी भारद्वाज (तिच्या पित्यानेच) या उभयतांनी नक्षत्र आणि ग्रहण हे अंतरिक्षात अस्तित्वात असतात आणि रात्रीचे महत्व दैवी- देवी अभिजात असते हे सिद्ध करून दाखवले.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास ही आदिमाया शाश्वत असून तिचे अस्तित्व सृष्टीचे संचालन, निर्माण आणि विनाशकारी त्रिकाल सत्य आहे. संपूर्ण विश्वाला लपटलेली माया तूच आहे. तू तुझ्या दिव्य तेजाने , सत्याच्या प्रकाशाने आमच्या मूर्त आत्म्याचे सर्व अज्ञान दूर कर. तूच आत्मा, परमात्मा, ब्रह्म, परब्रह्म यात वास करतेस. विकारांच्या साहाय्याने साधकांना भ्रमित करणारी असून तूच मोक्षाच्या साहाय्याने

मुक्तीच्या साहाय्याने त्याचे रक्षण कुविचारांपासून करणारी असतेस.

३. या ऋचेचा असा अर्थ आहे की, हे रात्री देवी! तू पराशक्ति आहेस. तू चिद्‌शक्ती स्वरूप आहेस. तू आपल्या भगिनीला- उषा अर्थातच प्राचीदेवीला परिग्रह करतेस. तू प्रभात होण्याकरिता साहाय्यभूत ठरते आणि प्रभात काली तुझ्याकारणेच अंधकार नष्ट होतो.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास आदिशक्ती! तू परा शक्ती तसेच चितशक्ती आहेस. तूच आपल्या ब्रह्मविद्या स्वरूपी प्राची देवीला परिग्रह करतेस. त्याकारणे तू ज्ञानाचा उदय (उष:काल) करणारी असून सर्वोच्च मुक्ती देणाऱ्या ज्ञानाची

प्रभात घडू शकणारीही आहेस. तूच आमच्या अज्ञानाचा, अविद्येचा अंधकार नष्ट करतेस.

४. या ऋचेचा असा अर्थ आहे की, हे रात्री देवी! आमच्यावर प्रसन्न हो, जेणेकरून तुझ्या आगमनाकारणे आमच्या व्यथा, चिंताचा, ताण-तणावांचा नाश होईल आणि आम्ही सुखाने व निश्चितपणे स्वगृही निद्राधीन होऊ शकू! तू आम्हाला असा आशिष दे. तुझी कृपादृष्टी अशीच राहु दे, आमच्यावर! ज्याप्रमाणे पक्षी वृक्षांवर बांधलेल्या त्यांच्या घरट्यामध्ये निश्चितपणे निद्रिस्त होतात, त्याचप्रमाणे आमची निद्राही निर्विघ्न पार पडू दे. आमृहाला निद्रा, स्वप्नदोष आणि निद्रा क्षय, निद्रानाश हे रोग न बाधोत.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास आदिशक्तीला आदिमाया, योगमाया असेही म्हटले जाते. तीच नारायणाला, शिवाला, ब्रह्माला आणि समग्र सृष्टीला योगनिद्रेने आधीन करत असते. तीच साधकांना विकारांच्या योगनिद्रेत निद्राधीन करून मायेला वशीभूत करते, तसेच तीच साधकांच्या मनातील विकारांचा नाश करणारी आहे. याशिवाय सुखपूर्वक, प्रसन्नपूर्वक निद्रा ज्याला परमानंदाची नशा म्हणावी, ती परमानंदाची अनुभूती आदिमायाच देते. ती साधकांतील प्रत्येक दोष दूर करते आणि त्याला परिपूर्ण बनते.

५. या ऋचेचा असा अर्थ आहे की, या करुणामयी रात्रीदेवीच्या मांडीवर संपूर्ण ग्रामवासी, मनुष्य, नगरवासी, पायांवर चालणारे, गो,अश्व, आदि पशु पंखांनी उडणारे पक्षी आणि पतंग इत्यादी कोणत्याही प्रयोजनाशिवाय यात्रा

करणारे पथिक, गृहहिन मनुष्य, श्येन इत्यादी सुखपूर्वक निद्रा ग्रहण करतात.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास संपूर्ण मानवजातीसाठी, वनस्पती, जीवजंतू, प्राणी-पक्षी, देव, मनुष्य, राक्षस आणि गंधर्व, किन्नरांसाठी, इतकेच नव्हे तर महत्वकांक्षी श्येन पक्षीसाठीही तुझ्याच मांडीचा, कृपेचा, आशीर्वादाचा, प्रेमाचा वात्सल्याचा आणि ममतेचा आश्रय आहे.

६. या ऋचेचा असा अर्थ आहे की, रात्री देवी! तू चितशक्ती, चेतना शक्ती आहेस. तूच आमची इच्छाशक्ती आहेस. कृपा करून रात्रीची चित्कार करणाऱ्या व आमच्या निद्रा भंग करणाऱ्या कोल्हयांना, लांडगांन्या आमच्यापासून दूर कर. रात्री चोरी करणाऱ्या दस्युंनाही दूर करून धन-धान्याचे रक्षण कर. त्यानंतर तू आमचे सुखपूर्वक तरण कर

आणि तू आमच्याकरता मोक्ष दायिनी, कल्याणकारी सिद्ध हो.

आध्यात्मिक दृष्टीने पाहिल्यास आदिशक्ती! तू चितशक्ती, चेतनेची, इच्छांची स्वामिनी असून संपूर्ण सृष्टीची इच्छा शक्ती आहेस. तू कृपया वासनामय आणि पापमय कोल्हयांना तसेच संभ्रमाच्या, अहंकाराच्या लांडग्यांना साधकांपासून दूर कर. कारण ते उभयंता साधकांच्या साधनेत बाधक ठरताहेत. साधनेवेळी वितृष्णा, शोक, क्षय, मृत्युचे भय, काम आणि क्रोध असा तस्कर समुदाय- परमानंद आणि प्रवृत्तनिधी चोरून पाहतो, त्यांचेही तूच निवारण कर. तूच आम्हा साधकांना भवसागरातून तरून ने, आम्हा साधकांकरिता कृपा दायनी, मोक्षदायिनी तसेच कल्याणकारी हो.

७. या ऋचेचा असा अर्थ आहे की, हे प्राची! हे रात्रीची, अंध:कार्याची आणि तेजाची अधिष्ठात्री देवी! तू ज्ञान-अज्ञान, स्थिरता-अस्थिरता आणि प्रकाश-अध:कार्याची नियंत्रक-नियामक आहेस. आता आमच्या उत्थानाचा समय झाला आहे. त्याकाळचे हा कृष्णवर्णी अंधकार तू ऋणाप्रमाणे दूर कर., ज्याप्रमाणे धन देऊन तू भक्तांचे ऋण फेडतेस, त्याप्रमाणेच तू हा अंधकार नाहीसा कर, कारण ह्या अधंकाराने आम्हाला वेढले आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास साधक आदिमायेला विनंती करताहेत की या अज्ञान व विकाररुपी अंधकारात आम्हाला अधीन करू नकोस. तुझ्या कृपेने हा आमच्या आध्यात्मिक प्रगतीचा समय आहे. त्याकारणे तू आम्हाला ज्ञान प्रदान करून आमचे भक्तीचे ऋण चुकव आणि प्राचीप्रमाणे तू आम्हाला यज्ञ व किर्ती दे. तू हा अज्ञान अंधकार दूर कर, ज्ञानविद्या प्रदान करून!

८. या ऋचेचा असा अर्थ आहे की हे देवी माता रात्री! तूच काली आहेस, तूच आमच्याकरिता धेनू आहेस, तू स्वर्गाची अभिव्यक्ती आहेस. तूच परमव्योम (आकाशस्वरुप) स्वर्गाची, परमात्म्याची पुत्री आहेस आणि त्यांची माताही. मी तुझ्या समीप येऊन तुझी स्तुती करुन तुला संपूर्ण विश्वाच्या हिताच्या अनुकूल करून घेत आहे. तुझ्या कृपेतच माझे साफल्य आहे. तू स्तोमाप्रमाणे (यज्ञाप्रमाणे) मी दिलेले हविष्य स्वीकार करावेस, हीच विनंती आहे.

अध्यात्म दृष्टीने पाहिल्यास आदिशक्तीची विभिन्न स्वरूपे आहेत- काली, कामधेनु, पांचाली, स्वर्ग लक्ष्मी, शची, परमात्म्याचे पुत्री- माता, चेतना शक्ती, वाक् शक्ती, चितशक्ती, रात्री देवी. हे आदिशक्तीचे एक अभिव्यक्ती रूप स्वर्ग हे आहे. तिचे दुसरे रूप परमव्योम, आकाश, तसेच

परमात्माही आहे. तीच परमात्म्याच्या प्रसव करते आणि ती स्वयम् त्याच्या स्थानी जन्म घेते. साधकाने आत्म्याच्या साहाय्याने तिचे सामीप्य प्राप्त करावे. तिच्या कृपेनेच-सामीप्यानेच साधक कामक्रोध आदि षडरिपुंना पुन्हा जिंकू शकतो. तिच्या कृपेने भक्ताचा सदैव विजय होत असतो. मात्र ती यज्ञाप्रमाणे आहे. तिला प्रसन्न करण्यासाठी आहुती (बलिदान, त्याग) करावा लागतो.

हे सूक्तही अद्भुत व अद्वितीय आहे.कारण या सूक्तात स्वयं ऋषिका रात्री स्वतःच्या रात्रीरुपाचे स्तवन करते आहे. याशिवाय कालीदेवीला 'काल रात्री' असे संबोधले जाते.

म्हणूनच देवीपुराण, देवीमाहात्म्य आणि देवी सप्तशती पठणासमयी वाक् सूक्त, देवी सूक्त श्रीसूक्त, देवी अथर्वशीर्ष व तन्त्रोक्त सूक्तांसह ह्या सूक्ताचेही पठण-पारायण महत्वपूर्ण मानले जाते.

## परिशिष्ट

१) अथातो धर्मजिज्ञासा :- धर्माचे मूळ हे जिज्ञासा आहे, वेदातील आद्य वचन.

२) मोक्ष :- हिंदू धर्मातील चौथा पुरुषार्थ,. त्रिविध तापांपासून आणि जन्म-मृत्युच्या फेऱ्यातून मुक्ती.

३) संज्ञान :- परिचय, ज्ञान.

४) कारके :- घटक.

५) अहं ब्रहमासि :- मी ब्रह्म आहे.

६) त्वम् ब्रह्मासि :- तू ब्रम्ह आहेस.

७) सर्वम खल्विदम ब्रह्म :- हे सर्व काही ब्रम्हच आहे.

८) मूर्धन्य :- सर्वोच्च स्थान, मुकुट मणी.

९) आर्य :- भारतीय वैदिक लोक.

१०) पराविदया :- वैदिक तत्वज्ञान, अक्षय ज्ञान.

११) ब्राम्हण्ये :- यज्ञाचे विवेचन करणारे वेद ग्रंथ.

१२) आरण्यके :- यज्ञाचे प्रयोजनाचे विवेचन करणारे वेद ग्रंथ.

१३) सद्वस्तूमिमांसा :- सद्वस्तुंचे मीमांसा करणारे शास्त्र, ज्याला सत्ताशास्त्र किंवा तत्त्वज्ञान असेही म्हटले जाते.

१४) सत्ताशास्त्र :- अत्तीद्रिय सत्तांचा अभ्यास करणारे शास्त्र.

१५) शक्तिसूत्रे :- देवीची,शक्तीची महती विषद करणारी सूत्रे.

१६) ब्रम्हसूत्रे :- बृहद आणि तैतरिय या उपनिषिधांमधे आढळणारी आणि ब्रम्हाविषयी स्पष्टीभूत करणारी सूत्रे.

१७) अध्यात्म :- आत्म्याचे अत्तीद्रिंय सृष्टीचे आणि सत्तेचे शास्त्र.

१८) अतीद्रिंय :- इंद्रियांच्या पलीकडचे.

१९) पारलौकिक :- लौकिकापलीकडचे.

२०) स्वभाव :- स्वत्वाचा भाव क़िंवा स्वतःचे स्वरुप.

२१) अपौरुषेय :- कोठल्याही एका व्यक्तीने न रचलेले.

२२) यातुविदया :- विभिन्न सिध्दी. अणिमा, गरीमा, वशीकरण, जारण, उच्चाटन, स्तंभन इत्यादी.

२३) गंधर्व वेद :- नृत्य गायनाचा उपवेद.

२४) धनुर्वेद :- धनुर्विद्येचा उपवेद.

२५) आयुर्वेद :- चिकित्सा आणि उपचार यांच्या संबंधीत असलेला उपवेद.

२६) नासदीय :- जे असद् नाही, असे.

२७) प्रजापती :-ब्रम्हांचे पुत्र आणि सृष्टीकर्ता.

२८) अनस्तित्त्व :- ज्याचे अस्तित्व नाही, असे.

२९) भेदद्वंदे :- फरक आणि त्यासंबंधित असलेल्या जोड्या, उदा. सत आणि असत, दिवस- रात्र इत्यादी.

३०) स्वधा :- प्रजापतीचं रुप किंवा ब्रम्हाचं रुप.

३१) सत :- जे कधीच नष्ट होणार नाही, असे.

३२) तमस् :- अधंकार

३३) तेजोशलाका :- प्रकाशाची ठिणगी किंवा स्पंदन.

३४) स्फुरण करणारे तत्व :- स्व-निर्मित होणारे तत्त्व.

३५) इंद्रियगोचर :- इंद्रियापलीकडे.

३६) वागाम्भुणी :- अम्भृण ऋषींची कन्या वाक् (वाणी)

३७) ऋत्विजकर्मे :- ऋत्विजा्ंचे कर्म, यज्ञ, होत्या, संन्यास,. तीर्थभ्रमण इत्यादी.

३८) सरमा :- देवतांची सूचिका, दूतिका आणि देववाणी.

३९) गोनिधी :- गाई.

४०) गर्वित :-  मानी अथव अहंकारी

४१) द्युलोक :- स्वर्ग.

४२) गंतव्य :- स्थान.

४३) आवृत्त :- झाकलेले किंवा लपवून ठेवलेलं.

४४) गोग्रहण :- गाई ग्रहण करणे, किंवा गाई आपल्या नियंत्रणात आणणे.

४५) अयास्य:- एक महर्षि.

४६) अंगिरस :- सप्त ऋषींमधील एक ऋषी.

४७) नऊ गति :- शरीराच्या गती.

४८) महासुखनिधी :- मनाचा परमानंद, चिदानंद.

४९) सारयित्री :- प्राण पुरवणारी किंवा चेतना प्रदान करणारी.

५०) प्रवृत्ती निधी :- विभिन्न प्रवृत्ती.

५१) अविन्द:- घोर पराक्रमी आणि ज्ञानी

५२) विप्र :- ज्ञाते ब्राह्मण.

५३) ब्रम्हरंध :- मस्तिष्कावरचा भाग.(टाळू)

५४) वाणिक् :- व्यापारी.

५५) पांचाली :- पाच पांडवांची पत्नी, महाभारताची महानायिका.

५६) शची पोलौमी :- पुलोमाची पुत्री शची आणि इंद्राची पट्टराज्ञी.

५७) स्नुषणा :- पुत्रवधू.

५८) वृषाकपि :- एका संदर्भानुसार इंद्राचा मित्र, आणि दुसऱ्या संदर्भानुसार इंद्राची पत्नी.

५९) सपत्नी :- पतीची अन्य पत्नी.

६०) अग्रगण्या :- मुख्य, प्रमुख.

६१) अनुचरण :- मान्य करणे किंवा त्यानुरुप चालणे.

६२) असपत्नी :- सपत्नी नसणारी.

६३) नश्यमान :- नष्ट होणारे.

६४) ग्रहणस्वरुप :- ग्रासणे किंवा एखाद्याला गिळंकृत करण्याचा प्रयत्न करणे.

६५) अजातशत्रू :- ज्याचा शत्रू उरलाच नाही किंवा जन्मलाच नाही, असा.

६६) आन्वीक्षिकी :- विश्वाकडे अतींद्रिये सत्तेकडे पाहण्याचा दृष्टिकोन.

६७) सर्वविध :- सर्व प्रकारचे.

६८) वाक् शक्ती :- वाणीची शक्ती, किंवा वाणी देवता.

६९) आदिमायिन :- माया रचणारा आदिपुरुष.

७०) वाक् सूक्त :- वागाम्भृणी सूक्त, देवी सूक्त.

७१) रश्मी :- सूर्याची किरणे

७२) बृहदारण्यक उपनिषद;- दशम मुक्तिक, १०८ उपनिषदांतील महत्त्वपूर्ण उपनिषद

a. परिग्रहित:- ग्रहण करणे किंवा उद्मित करणे

b. वितृष्णा:- घृणा, अतिकामना

७३) थेलेस :- ग्रीक तत्त्वज्ञ.

७४) ॲनॅक्झिमीनस व अनक्सिमींडर:- दोन सहानुयायी तत्त्वज्ञ.

# संदर्भ ग्रंथांची सूची


१) हिंदू तत्त्वज्ञान

२) ऋग्वेद

३) ब्राह्मण पुराण

४) महाभारत

५) सती द्रौपदी

६) देवी पुराण

७) द्रौपदी खंडकाव्य- नरेंद्र शर्मा

८) देवी माहात्म्य

९) देवी सप्तशती

१०) भगवद्गीता

११) यज्ञसूक्ते

१२) शक्तिवचने :- कुमारी शक्तिलीला

१३) विकिपीडिया आणि फेसबुक

१४) टिळकांचे वेदांवरील भाष्य

१५)    वैदिक ऋषिकांओं के मंत्रो में निहीत गूढ तत्वज्ञान :- डॉ. अर्चना कुमारी दुबे.

१६)    वेद एवं निरुक्त:- संस्कृत पाठ्यपुस्तक.

१७)    सायण भाष्य

१८)    निरुक्त भाष्य- चंद्रमणी विद्यालंकार

१९)    ऋग्वेद भाष्य- जयदेव विद्यालंकार आणि महर्षी दयानंद.

२०)    आचार्य यास्क

२१)    पारिजात हरण

२२)    शैवतंत्र


२३)    भारतीय तत्त्वज्ञान :- एस वाय बी ए अभ्यासक्रम


२४)    अनंता :- रुपेंद्र कुमार.


२५)    ऋग्वेद में अत्रि ऋषी :- डॉ अशोक आर्य.

हे पुस्तक कसे वाटले, हे shaktileelanikita@gmail. com या माझ्या इमेल आयडीवर रिप्लाय देऊन कळवा.


**निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके**




पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा





# निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके















## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्षं.

## निकिता पाटील यांचं ई साहित्यवरचं हे अकरावं पुस्तक.

निकिता राजेश पाटील ही विद्यार्थिनी मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळया रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या यापुर्वीच्या पुस्तकांचे कौतुक जाणकार वाचकांनी केले आहे.

अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ

वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी, दिपूजा चव्हाण असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?